Saba Sayyed Sohil
M.Sc. Merit
Rank 8th
Batch 2019-20

गौरीशंकर सेवा समिती मलकापूर, व्दारा संचालित

विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

झेप २०२१

दि. प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक माहिती

प्रकाशन स्थळ	:	विज्ञान महाविद्यालय, मलकापूर
प्रकाशन काल	:	वार्षिक
मुद्रकाचे नांव	:	योगेश्वर प्रिंटर्स, मलकापूर मो. ९८८१६२०३४८
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	जनता कॉलेज समोर, मलकापूर, जि. बुलडाणा
प्रकाशकाचे नांव	:	डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य)
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा
संपादकाचे नांव	:	प्रा. डॉ. आर.टी. परिहार
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा
मालकी	:	विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा

मी डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, मलकापूर जि. बुलडाणा) जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य)

प्रकाशक

ह्या अंकातील मतांशी संपादक सहमत असतील असे नाही. तसेच वाङमयचौर्यास संपादक जबाबदार नाहीत.

झेप वार्षिकांक 2020-2021

झेंप वार्षिकांक 2020-21

गौरीशंकर सेवा समिती व्दारा संचालित

विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

संपादक मंडळ

शिक्षक प्रतिनिधी - प्रा. डॉ. आर. टी. परिहार

प्रा. सौ. जे. एस. कुळकर्णी

विद्यार्थी प्रतिनिधी - **मराठी विभाग :**

१) कु. अदिती पुरुषोत्तम राणे

२) कु. नम्रता निना करांडे

३) सुदर्शन शेषराव क्षिरसागर

४) कु. क्षितीजा विजय सराफ

हिंदी विभाग :

१) कु. पूनम अनिल फेंगडे

२) कु. चुनौती नेमीचंद छाजेड

इंग्रजी विभाग :

१) कु. श्रध्दा प्रमोद कोलते

२) कु. योगीता नितीन राजदेव

तासिका तत्वावरील प्राध्यापक

अ.क्र.	शिक्षकाचे नांव	विषय
१	डॉ. वाय.एन. सरदार	इंग्रजी
२	ए. एस. काळे	मराठी
३	कु. एम.एस. तलरेजा	रसायनशास्त्र
४	कु. पी.एम. राजपूत	रसायनशास्त्र
५	श्री. डी.डी. कासार	रसायनशास्त्र
६	कु. पी.ए. जाधव	प्राणीशास्त्र
७	श्री.एस. पी. शंखपाळ	वनस्पतीशास्त्र
८	एम.डी. नारखेडे	वनस्पतीशास्त्र
९	एन.एस. सोनोने	वनस्पतीशास्त्र
१०	श्री.डी.ए. झोपे	पदार्थ विज्ञान

महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद

अ.क्र.	शिक्षकाचे नांव	विषय	पदनाम
१	डॉ. बी. बी. वानखडे	रसायनशास्त्र	प्राचार्य
२	श्री. एस. व्ही. बोरले	वनस्पतीशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
३	श्री. ए. जे. राठी	प्राणीशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
४	डॉ. वाय. डी. पाटील	गणित	सहाय्यक प्राध्यापक
५	डॉ. सी. एम. भारंबे	प्राणीशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
६	श्री. व्ही. एस. देवळे	शा. शिक्षण	शारिरीक शिक्षण
७	श्री. डि. वाय. ढाले	भौतिकशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
८	डॉ. जी. एच. कुऱ्हाडे	रसायनशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
९	डॉ. आर. टी. परिहार	रसायनशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
१०	डॉ. वाय. पी. पाटील	वनस्पतीशास्त्र	सहयोगी प्राध्यापक
११	सौ. जे. एस. कुळकर्णी	ग्रंथालय	ग्रंथपाल
१२	श्री. ए. एफ. गोतरकर	गणित	सहाय्यक प्राध्यापक
१३	प्रा. सौ.पी.एम. इंगळे	संगणकशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
१४	प्रा.आर.एस. निकम	भौतिकशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक
१५	प्रा.आर.एन. पाटील	भौतिकशास्त्र	सहाय्यक प्राध्यापक

महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नांव	पदनाम
१	श्री. एस.जी. नारखेडे	मुख्य लिपीक
२	श्री. एम. के. सदावर्ते	वरिष्ठ लिपीक
३	श्री. एम. डब्ल्यू. कोलते	कनिष्ठ लिपीक
४	श्री. जी. एम. चव्हाण	प्रयोगशाळा सहाय्यक
५	श्री. पी. जी. कोलते	प्रयोगशाळा परिचर
६	श्री. व्ही. व्ही. पाचपोर	शिपाई
७	श्री. आर. एम. दांडगे	शिपाई
८	श्री. ए. व्ही. पाटील	शिपाई
९	सौ. एस. व्ही. भारंबे	ग्रंथालय परिचर
१०	श्री. बी.ए. सावळे	प्रयोगशाळा परिचर
११	श्री. व्ही. एस. तायडे	प्रयोगशाळा परिचर
१२	श्री. यु. व्ही. शिंदे	प्रयोगशाळा परिचर
१३	श्री. आर. एस. डाबेराव	प्रयोगशाळा परिचर

Vision, Mission & Goals of College

Vision :

A scientific and educational community that is open and welcoming, creative and adaptive and renowned for excellence in knowledge and skills.

Mission Statement :

We are committed to quality education, empowering personalities and development of responsible members of the society.

Goals :

* To Impart quality based higher education in science for rural based society.
* To develop scientific approach, humanism, spirit of enquiry and reform in the youth of society.
* Utilization of acquired knowledge in problem solving of the society.
* Development of various basic skills among the students so as to become independent members of the society.
* To provide platform for the development of physical, mental and moral strength sport, extension and co-curricular activities.
* To attain community and social development through the optimum use of infrastructure facilities of the institution.
* To streamline the exuberance of youth for the sake of nation building.

संपादकीय....

प्रिय विद्यार्थी,

सत्र २०२०-२०२१ चा झेप अंक प्रकाशित करत असतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

महाविद्यालयीन कार्यकाल हा विद्यार्थी जिवनातील सुवर्णकाल आहे. अध्ययनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण, विचार, आकलनशक्ती निर्माण व्हावी, त्यांच्या विचारांना वाट मिळावी याकरिता केलेला हा छोटासा प्रयत्न होय. विद्यार्थ्यांमध्ये अनेक कवी, साहित्यिक, विचारवंत उदयास येवू शकतात. विविध क्षेत्रामध्ये विद्यार्थी पारंगत व्हावे. स्वत:विषयी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा त्यांना विविध विषयावर लिखाण करण्याची संधी प्राप्त व्हावी म्हणून हा वार्षिकांक आम्ही प्रकाशित केला आहे.

या अंकात विद्यार्थ्यांनी विविध विषयावर कविता, लेख या माध्यमातून त्यांनी आपल्या सुप्त गुणांना वाव दिला. मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती साकार झाल्या. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत विधायक बदल घडवून सामाजिक जाणिव निर्माण व्हावी त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणेच व्यक्तीमत्व विकास घडवून आणावा.

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. बी.बी. वानखडे सर यांनी अंक तयार करण्यासाठी खूप मोलाचे मार्गदर्शन केले. संपादक मंडळाच्या वतीने आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो. सर्व प्राध्यापक मित्र आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुध्दा मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे.

योगेश्वर प्रिंटर्स, मलकापूर यांनी मुद्रणाचे काम चांगल्याप्रकारे व वेळेत पूर्ण करुन दिले त्यांचाही मी ऋणी आहे.

संपादक,

प्रा. डॉ. रमेश तुकाराम परिहार

झेप वार्षिकांक 2021

प्राचार्यांचे मनोगत

झेप वार्षिकांक २०२०-२०२१ प्रकाशित होत असल्याबाबत सर्वप्रथम संपादक मंडळाचे अभिनंदन.

२०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष संपूर्णपणे कोविड महामारीच्या सावटाखाली निघुन गेले. कोरोना विषाणूचा कहर अजुनही संपलेला नाही. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने पहिल्या लाटेपेक्षा जबरदस्त हानी पोहचवली त्यामुळे तिसऱ्या लाटेच्या अनामिक भितीपोटी उच्चशिक्षण संस्था संपूर्ण ताकदीनीशी केव्हा कार्यान्वीत होतील याची अजुनही शाश्वती नाही. दृकश्राव्य माध्यमातुन शिक्षण, मूल्यमापन व परीक्षा सुरु असल्या तरी विद्यार्थ्यांची कधीही भरुन न निघणारे शैक्षणिक नुकसान मात्र झालेले आहे.

संकट आले की त्याचा सामना करण्यासाठी मनोनिग्रह व कणखरता असणे आवश्यक आहे. कोरोना संकटामुळे जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन पार बदलेला आहे. या संकट काळात माणुसकीचे उदात्त स्वरुप दिसले त्याचबरोबर संवेदनरहीत हिडीस घटनांचे सुध्दा दर्शन झाले. अशा या संकटकाळात ताऊन-सुलाखुन निघालेल्या शिक्षण क्षेत्रापुढे विशेषकरुन उच्चशिक्षण क्षेत्रापुढे नवनवी आव्हाने उभी ठाकलेली आहेत.

या आव्हानांचा सामना जी व्यक्ती आपल्या कुशाग्र बुध्दीने व शांत-संयमी चित्तवृत्तीने करेल त्यांना यशाची खात्री जास्त राहील.

विज्ञान महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांना येणाऱ्या काळात सर्व प्रकारच्या आव्हानांचा सामना करण्याचे बळ मिळो व भविष्यात भरघोस यश मिळो या शुभेच्छांसह.

प्राचार्य डॉ. बी.बी. वानखडे
विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

अनुक्रमणिका

शिर्षक	पृष्ठ क्र.
१) विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती	
२) मराठी विभाग	
३) हिंदी विभाग	
४) इंग्रजी विभाग	
५) महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी	

✻ विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती ✻

प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)

प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)

प्रणाली हिवाळे B.Sc. III (PCM)

प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)

✻ विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती ✻

प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)



प्रणाली हिवाळे B.Sc. III (PCM)

प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)

✻ विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती ✻



प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)



प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)



प्रतिक्षा वराडे B.Sc. II (CPS)

डिडरोट इफेक्ट
ज्याचे परिणाम खूप भयानक आहेत ?

- डॉ. रमेश परिहार

ही १७६५ सालची गोष्ट. डेनिस डिडरोट आतापर्यंत ५२ वर्षांचा झाला होता. त्याने खूप जास्त पुस्तके वाचलेली होती आणि जणू त्याची लायब्ररीच त्याच्याकडे होती. तरी त्याने त्याचे पूर्ण आयुष्य गरीबीत काढलेले होते. त्याच्या मुलीच्या लग्नासाठी सुध्दा त्याच्याकडे पैसे नव्हते.

एकेदिवशी रशियाची त्यावेळेची राणी कॅथरीनला डिडरोटच्या ह्या गरीबीबद्दल माहित झाले. तिने डिडरोटला त्याच्याकडील लायब्ररी विकत घेण्यासाठी 1000 GBP, म्हणजेच ५० हजार डॉलर्स किंवा आताचे जवळपास साडेतीन करोड रुपये डिडरोटला देऊ केले आणि डेनिस डिडरोट एका दिवसात खूप श्रीमंत झाला.

त्याने लगेच त्या पैशातून 'स्कालॅट रॉब' म्हणजे एक उच्चप्रतीचा सदरा विकत घेतला जो अतिशय महागडा होता. हा सदरा वापरत असतांना त्याला अचानक जाणवले की आपण घालतोय अतिशय उच्चप्रतीचा सदरा आणि आपल्या घरात त्याच उच्चप्रतीच्या वस्तू नाहीत. मग त्याने हळूहळू घरातल्या वस्तू बदलल्या, किचन रुममधल्या वस्तू बदलल्या, फर्निचर बदलले आणि अशा सगळ्या नविन वस्तू विकत घेतल्या ज्यामुळे आता पूर्ण घर आणि सदरा एकमेकांना शोभून दिसत होते.

परंतु हे सगळे करण्यामध्ये तो पूर्णत: कंगाल झाला आणि त्याच्या नावावर असलेले कर्ज जास्तच वाढून गेले. त्याने हे सगळे दु:ख कष्टाने सहन केले आणि हे सगळे आपल्या एका निबंधात नमूद करुन ठेवले.

ह्याला मानसशास्त्रात डिडरोट इफेक्ट (Diderot Effect) म्हणतात. मोठ्या कंपन्या, विक्रेते, डेव्हलपर्स ह्या इफेक्टचा वापर छुप्या पध्दतीने करतात.

तुम्ही ३०,००० चा मोबाईल घेणार. मग तुम्हाला काहीतरी कमी वाटेल मग तुम्ही अजुन ५०० रुपयाचा गोरील्ला ग्लास लावणार. ५००-६०० रुपयाचे महिन्याला कव्हर बदलणार. जिथे ५०० रुपयाचा हेडफोन कामी आला असता तिथे ३००० चा हेडफोन घेणार कारण तो मोबाईलला जास्त शोभून दिसेल. एखाद्या निळ्या रंगाचा मस्त शर्ट घेतला की त्याला मॅचींग असलेले घड्याळ किंवा पॅन्ट घेणार.

घरी मस्त मोठी टिव्ही आणला की चांगला टेबल आणणार, त्याला टाटा स्काय लावणार, एच.डी. वाहिन्या सुरु करणार, रंग चांगला लावला की खिडकीला परदे लावणार सजावट करणार.

डिडरोट इफेक्ट एका वाक्यात थोडक्यात सांगायचे झाले म्हणजे "एक नवीन वस्तू विकत घेतली

असता तिच्यामुळे दुसऱ्या वस्तूंचा दर्जा आपोआप कमी होतो आणि तो वाढविण्यासाठी आपल्या हातून नकळतपणे जास्त खर्च होतो.''

तुम्ही पहा, सगळे विक्रेते छुप्या पध्दतीने डिडरोट इफेप्टचा वापर करतात. एक साधा चहा वाला तुम्हाला चहासोबत सिगारेट देऊ का विचारतो ? सिम विकणारा ३ किंवा ४ महिन्याचे पॅक्स् टाकून द्यायचे म्हणतो, एक लॅपटॉप विकत घेतांना त्यासोबत २ ते ३ हजाराचा ॲन्टीव्हायरस टाकून मिळतो. लिंबू, अद्रक, टमाटे घेतल्यावर तुम्हाला म्हटले जाते, ''मिरची पण घ्या की !'', भांडे घेतल्यावर त्याच्यावर ५० रुपयात नाव कोरुन मिळते, झाडं विकत घेतली की १०० रुपयाला त्याचं खत मिळते. अशी असंख्य उदाहरणे आहेत.

आपण घेतो एक वस्तू आणि दुसऱ्या वस्तू आपोआप घ्याव्याशा वाटतात भले त्यांची गरज आपल्याला नको आणि अशा पध्दतीने आपण एक वस्तू घेऊन अनेक अनावश्यक किंवा फारसे महत्त्वाच्या नसणाऱ्या वस्तू त्या पण गरज नसतांना घेऊन टाकतो आणि आपल्याला कळत सुध्दा नाही. त्याला ''Spiraling Consumption'' असे म्हणतात. म्हणजे एकामुळे दुसऱ्या अनेक गोष्टी गरजेचे वाटणे आणि विकत घेतल्या जाणे.

लक्षात ठेवा हा ''डिडरोट इफेक्ट'' (Diderot Effect) ही मानवी मनाची वागणूक आहे. ह्युमन टेन्डन्सी !! आणि ह्याला थांबवले जाऊ शकते. ह्याचे परिणाम भयानक आहेत का ? मी सांगेल जास्त भयानक आहेत. कारण परिणाम उघड्या डोळ्यांनी नाही दिसत. आपण नकळतपणे अनावश्यक खर्च करतच जातो आणि खूप उशिरा लक्षात येत हे सगळे. माणसाला खर्च करण्याची भीती वाटत नाही. त्रास होतो तो हिशोब न लागण्याचा !! तुम्हीच स्वत:ला प्रश्न विचारायचा ''मला ह्या वस्तूची खरच गरज आहे का ?'' उत्तर हो आले तर आहे त्या किंमतीत न घेता परवडणाऱ्या किंमततीत वस्तू शोधावी. वस्तूंची उपयोगिता किती त्यानुसार त्यांना विकत घ्यायचे, ना की स्वत:चे ते किती स्टेटस् वाढवतील त्यामुळे. समोरच्याने दुसरी वस्तू दाखवली तरी भान विसरायचे नाही. लक्षात ठेवायचे की, ''वस्तू मस्त, भारी वाटली तरी तिचा तुमच्या आनंदाशी आणि उपयोगितेशी काडीचा संबंध नाही.'' आनंद वाटत असला तरी तो क्षणिक असतो. कालांतराने आनंद जातो आणि पैसे सुध्दा । त्याचा परिणाम आपल्या जिवनावरती होतो असा आहे हा ''डिडरोट इफेक्ट'' (Diderot Effect)

मी माणूस घडवतोय...

मनोज सदावर्ते

एका गुरुकडे एक अभ्यागत बसले होते. काही शास्त्र चर्चा सुरु होती. एक शिष्य आत आला, दार लावलं. पादत्राण काढून ठेवली. गुरुंच्या समोर येऊन बसला. गुरु थोडा वेळ शांत राहीले. मग अगदी मृदू स्वरात म्हणाले, ''बेटा जा....दाराची आणि जोड्याची माफी मागून ये.'' शिष्य उठला, दारापाशी गेला, माफी मागितली, जोड्यांचीही माफी मागितली. पाहुणे अचंबित झाले. म्हणाले ''हा काय प्रकार? दाराची आणि जोड्यांची माफी?'' गुरु म्हणाले, ''तो आला तेव्हा घुश्यात होता, त्याने दार जोराने आपटलं आणि जोडे रागाने भिरकावले होते.''

पाहुणे म्हणाले, ''पण म्हणून निर्जीव वस्तूंची माफी मागायची ?'' गुरु म्हणाले, ''निर्जीव वस्तूंवर राग काढता येतो, तर त्यांची माफी का नाही मागायची?'' पाहुणे म्हणाले ''पण याच्या रागाचा किंवा माफीचा दरवाज्यावर किंवा जोड्यांवर काय परिणाम होणार?'' गुरु म्हणाले ''पण मी कुठे दरवाजा किंवा जोडे घडवतोय... मी माणूस घडवतोय.''

कर्माचा भागीदार कोण ?

मनोज सदावर्ते
(लिपीक)

एक ब्राह्मण दुपारी भिक्षा मागण्याकरिता एका दारात उभा राहीला. ''ॐभवती भिक्षांदेहि'' – अशी गर्जना केली.

घरात एकटीच म्हातारी होती, ती म्हणाली, ''महाराज ! मी एकटीच आहे, घरात आमटी भात तयार आहे, चार घरात भिक्षा मागण्यापेक्षा आज इथेच जेवण करा.''

ब्राह्मण ''हो'' म्हणाला. ब्राह्मणाचे जेवण झाले ब्राह्मणाने ताक मागीतले. नेमकं म्हातारीच्या घरात त्या दिवशी ताक नव्हते. ती म्हणाली, ''थांबा महाराज मी आत्ता शेजारणीकडून ताक घेऊन येते.''

तिने शेजारीकडे ताक मागीतले. शेजारणीने भांडेभरुन ताक दिले. आजीने ब्राह्मणाच्या भातावर ताक घातले. ब्राह्मणाने भुरका मारला तो शेवटचाच. ब्राह्मण तडकाफडकी मेला.

चित्रगुप्त आणि यमाला प्रश्न पडला की, या कर्माचा भागीदार कोण ? कारण ब्राह्मणाने आत्महत्या तर केली नव्हती. आजीने अतिथी धर्म तर पाळला होता. शेजारणीने शेजारधर्म पाळला होता. कोणी दारात मागायला आले तर नाही म्हणून नये म्हणून तिने ताक दिले होते आणि ताक पिऊन ब्राह्मण मेला होता कारण त्या ताकात विष होते आणि हे विष एका नागाच्या तोंडातून त्या ताकात पडले होते.

यमाने नागाला जाब विचारला, नाग म्हणाला ''यात माझा काय दोष ? घार मला पकडून आकाश मार्गे चालली होती. माझे तोंड खाली झाले होते त्यामुळे माझ्या तोंडातील गरळ त्या ताकात पडले. म्हणून ब्राह्मण मेला.''

यमाने घारीला जाब विचारला. घार म्हणाली ''यात माझा काय दोष? सापाला पकडून खाणं हा माझा धर्म आहे.''

प्रत्येकाने आपला धर्म पाळला होता. मग आता या कर्माचा भागीदार मी तुम्हाला दाखवतो. दोघेही गुप्तरुपाने ब्राह्मण मरुन पडला होता तिथे आले. हा ! हा ! म्हणता संपूर्ण गावात बातमी पसरली की, आजीच्या घरी जेवताना ब्राह्मण मेला. हळूहळू आळीतल्या बायका तिथे जमल्या. एक बाई ताईना म्हणाल्या, ''काय हो आजी ब्राह्मण कसा काय मेला?'' तेव्हा एक बाई म्हणाली, ''आहो कसं सांगु तुम्हाला या ब्राह्मणाकडे भरपूर द्रव्य होते, ते द्रव्य हडप करण्यासाठी आजीने भोजनात विष घालून ब्राह्मणाला ठार मारले.''

चित्रगुप्त यमाला म्हणाला पहिल्या क्रमांकावर या बाईचे नांव लिहा आणि तिथे जे जे कोणी या घटनेबद्दल चुकीचे बोलत होते त्यांना या कर्माचे भागीदार बनवले व जे जे बदनामी करतात त्यांच्या माथी मारले गेले.

एखाद्या घटनेबद्दल सत्य माहित नसतांना बोलणे हे सुध्दा फार मोठे पाप आहे. जो पर्यंत एखादी घटना तुम्ही प्रत्यक्ष स्वत:च्या डोळ्यांनी पाहत नाही किंवा स्वत:च्या कानाने ऐकत नाही तो पर्यंत तुमच्या तोंडाने ती बोलू नका कारण हे सुध्दा एक प्रकारचे पाप आहे.

संघर्ष...

सौ. ज्योती सुरेंद्र कुळकर्णी
Librarian

गरुडाचे जीवनमान ७० वर्षाचे असते परंतु तो जेव्हा ४० वर्षाचा होतो. तेव्हा त्याला एक महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागतो.

त्या अवस्थेत त्याच्या शरीराचे ३ महत्त्वाचे अवयव निष्प्रभ होऊ लागलेले असतात. पंजे लांब आणि लवचिक होतात, ज्यामुळे शिकार पकडता येत नाही, चोच पुढील बाजुला वळते ज्यामुळे भोजन करता येत नाही, पंख जड होतात व छातीस चिकटल्यामुळे पूर्णपणे उघडत नाही. गरुड भरारी सिमित करतात. अन्न शोधणे, सावज पकडणे, अन्न खाणे या तिनही क्रिया गरुडासाठी अवघड होऊन बसतात. अशावेळी त्याच्याकडे तीन पर्याय असतात. एक तर प्राण त्याग करणे, दुसरा आपली प्रवृत्ती सोडून गिधाडाप्रमारे मृत अन्नावर जगणे आणि तिसरा पर्याय असतो, आकाशाचा अनभिषक्त सम्राट म्हणून स्वत:ला पुर्नस्थापित करणे.

जिथे पहिले दोन पर्याय सोपे व सुलभ आहेत तिथे तिसरा अत्यंत कठिण आणि दुर्धर, गरुड तिसरा पर्याय निवडतो. एखाद्या उंच पहाडावर जातो, एकांतात आपले घर बनवितो आणि स्वत:च्या पुर्नस्थापनेस प्रारंभ करतो. सर्वप्रथम तो आपली चोच दगडावर मारुनमारुन तोडून टाकतो. एका पक्ष्याला स्वत:ची चोच तोडण्याहून अधिक त्रासदायक दुसरे काय असेल ? प्रतिक्षा करतो चोच पुन्हा येण्याची तसेच तो आपले पंजे तोडून टाकतो आणि प्रतिक्षा करतो पंजे पुन्हा उगवण्याची. नविन चोच आणि पंजे आल्यानंतर तो आपल्या जड झालेल्या पंखांना एक एक करुन कापून टाकतो आणि वाट पाहतो नवे पंख फुटण्याची !

१५० दिवसाचा त्रास आणि प्रतिक्षेनंतर त्याला मिळते त्याची गरुड भरारी, या पुर्नस्थापने नंतर तो ३० वर्ष जगतो, ताकद आणि अभिमानाने !

याचप्रकारे मानवाच्या, आत्मविश्वासु सक्रियता आणि कल्पनाशक्ती या तिन्ही शक्ती दुर्बल होऊ लागतात. आपणही भुतकाळात अडकलेल्या बंधक अस्तित्वाचा त्याग करुन कल्पनेची मुक्त उड्डाण घेतली पाहिजे.

१५० दिवस नाही ६० दिवस द्या स्वत:ला पुर्नस्थापित करण्यासाठी जे शरीराला, मनाला चिकटलेले आहे ते तोडताना उचकटून काढतांना यातना तर होणारच ! पण यानंतरची उड्डाणे असतील ती उंच अनुभवी आणि अनंताकडे झेपावणारी.

दररोज काही चिंतन करावे. मानव ही अशी भूतलावरील एकमेव जात आहे जी स्वत:ला परिपूर्ण ओळखते, स्वत:मध्ये बदल घडवू शकते. गरज आहे ती लहान लहान बाबींमधून बदलाची सुरुवात करण्याची आणि ध्येयप्राप्तीसाठी झोकून देण्याची. (संकलित)

****

जाणून घ्या टीएमसी आणि क्युसेक्स म्हणजे काय ?

कु. आरती प्रमोद कोलते
M.Sc. II (Chem.)

पावसाळा सुरु झाला किंवा नदीला महापूर आला की टीएमसी आणि क्युसेक्स हे दोन शब्द दररोज सर्वसामान्यांच्या कानी पडू लागतात. पण अनेकांना त्याचा अर्थ लागत नाही आणि अनेकवेळा त्यांचा गोंधळ उडतो.

त्यासाठी टिएमसी म्हणजे काय, क्युसेक म्हणजे काय? हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. सध्या राज्यभरात तुफानी पाऊस सुरु आहे. अमूक एका धरणात एवढे टिएमसी पाणी साठले, अमूक एका धरणातून एवढे क्युसेक्स पाणी सोडले, अशा बातम्या कानावर येतात. त्याचे पक्के आकलन होण्यासाठी पाणी मोजण्याच्या या परिमाणांची माहिती आवश्यक आहे.

पाणी मोजण्याची सर्वसामान्यांना ज्ञात असलेले परिमाण म्हणजे लिटर, त्यामुळे लिटरमध्ये या बाबी समजुन घेणे अधिक योग्य ठरेल. पाणी मोजण्याची एकके अशी : १) स्थिर पाणी मोजण्याची एकके – लिटर, घनफुट आणि घनमीटर अशी आहेत. २) धरणातील पाणी मोजण्याचे एकक – टीएमसी (अब्ज घनफुट) असे आहे.

टिएमसी : एक टिएमसी म्हणजे एकावर नऊ शून्य (१०० कोटी किंवा १ अब्ज) इतके घनफुट म्हणजे १,000,000,000 घनफुट, एक घनफुट म्हणजे साधारणत: २८ लिटर ३१७ मिलिलीटर. त्या हिशोबाने एक टीएमसी म्हणजे २८३१ कोटी ६८ लाख ४६ हजार ५९२ लिटर इतके पाणी. छोट्या मोठ्या बंधाऱ्यातील पाणी मोजण्यासाठी दशलक्ष घनमीटर हे एकक वापरतात.

क्युसेसक्स : वाहते पाणी मोजण्यासाठी क्युसेक्स हे एकक वापरतात. एखाद्या धरणाच्या सांडव्यातून एका सेकंदात एक घटनफुट म्हणजेच २८.३१७ लिटर पाणी बाहेर पडत अससेल तर त्याला एक क्युसेक्स पाणी म्हणतात. सध्या धरणातून प्रतिसेकंद ५० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरु आहे. म्हणजे धरणातून एका सेकंदाला ५० हजार क्युसेक्स गुणिले २८.३१७ लिटर पाणी म्हणजे सेकंदाला १४ लाख १५ हजार ८५० लिटर पाणी सोडले जात आहे.

****

- उन्नीस बीस मधला फरक -

१९ – ठेव तो मोबाईल...आणि बस अभ्यासाला (२०१९)

२० – घे तो मोबाईल...आणि बस अभ्यासाला (२०२०)

आता हवंय पर्सनल लॉकडाऊन !

कु. निकिता रामराव हिवाळे
M.Sc. II (Chem.)

मार्च ते मे, या ३ महिन्यात बुलडाणा जिल्ह्यात कोरोनाबाधीत संख्येने पन्नाशीही गाठली नव्हती. तरीही लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी होती. मास्क वापरुन सोशल डिस्टन्सींग पाळल्या जात होती, भिती प्रचंड होती कोरोनाची... लग्न तर अगदी घरात लावली जात, अशी परिस्थिती पूर्वी होती.

जूनपासूनच्या तीन महिन्यात मात्र कोरोनाबाधीत मृतकांची संख्याच ५० पर्यंत पोहोचली असून, रुग्णांचा आकडा साडे तीन हजारावर गेलाय. विशेष म्हणजे, या कोरोनाचा शिरकाव राजकीय क्षेत्रात, मोठ्या प्रमाणावर होत आहे. शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांमध्ये सुध्दा कोरोनाची संख्या वाढतच आहे. अगदी डॉक्टर, पोलीस व पत्रकारांमध्येही कोरोना घुसला आहे. अनेक रुग्ण वा मृतकाची नोंद जिल्ह्याबाहेर असल्याने, त्याची नोंद घेणेही अनेकदा जिकरीचे होते.

एकूणच, कोरोनाचं आक्राळ–विक्राळ रुप धारण करत असल्याचं चित्र आहे. डॉक्टर्स व नर्सेस यांचं काम चांगलं असलं तरी, आरोग्य व्यवस्था कोलमडून जात असल्याचेही दिसत आहे. कोवीड सेंटरमध्ये सुविधांच्या नावानं बोंबाबोंब होत आहे.

आता खऱ्या अर्थाने जपण्याची वेळ आहे. स्वत:ला अन् समाजालाही. हनुवटीवरचा मास्क पुन्हा नाकावर येवू द्या. कुठल्याही अर्थानं होणारी गर्दी टाळा, आवश्यक असेल तरच घराबाहेर पडा. कामावर जावंच लागणार आहे, पण तिथंही सुरक्षा बाळगा. तोरणदारी व मरणदारी वाढलेली गर्दी पुन्हा आटोक्यात आणा.

नियंत्रण ठेवणारी यंत्रणा पार थकलीय, त्यामुळं आपणच आपल्यावर नियंत्रण ठेवा. काय होतयं? या हलगर्जीपणावर कृपया जावू नका. जपा, काही दिवसंतरी.. कारण कोरोना पोहचलायं बुलडाणा जिल्ह्यात घातक स्टेजला. त्यामुळं होवून गेलेल्या सरकारी लॉकडाऊन नंतर आता हवयं फक्त, पर्सनल लॉकडाऊन!

हृदयांतर...

श्री. बी. ए. सावळे

तात्वीक ‘भांडण’ सर्वांशी होते, पण ‘शत्रुत्व’ कुणाशीचं ठेवू नये... एखाद्याशी वाद घालावा, पण वादावादी न करता क्षणात सुसंवाद साधावा.

अहंकार हाच या सर्वांच मुळ आहे. तो विनाकारण बाळगुन जगू नये. शेवटी मृत्यू हे सुंदर, शाश्वत वास्तव आहे, त्याचे स्मरण असावे, भय नसावे. आपण जन्माला आलोय हे गेलेले दिवस मोजण्यासाठी नाही तर उरलेल्या दिवसांचा आनंद उपभोगण्यासाठी याचे स्मरण ठेवू या. आपण किती आनंदात आहोत त्यापेक्षा आपल्यामुळे किती जण आनंदात आहेत याला खूप महत्त्व आहे. एक हृदय घेऊन आलोय जातांना लाखो हृदयात जागा करुन जाता आलं पाहीजे.

क्षमा करा, प्रेम द्या प्रेम घ्या.

छंद....

दिनेश शंकर खराटे
M.Sc. II (Sem. IV)

※ कशास काय म्हणतात ?

१) जगाचे छप्पर - पामीरचे पठार
२) पवित्र भूमी - पॅलेस्टाईन
३) उगवत्या सूर्याचा देश - जपान
४) मध्यरात्रीचा सूर्य - नॉर्वे
५) हजार सरोवरांचा प्रदेश - फिनलँड
६) सात टेकड्यांचे शहर - रोम
७) सात बेटांचे शहर - मुंबई
८) पांढऱ्या हत्तीचा प्रदेश - सयाम (थायलंड)
९) व्हाईट सिटी - बेलग्रेड (युगोस्लाव्हिया)
१०) निळा पर्वत - निलगिरी पर्वत
११) काळे खंड - अफ्रिका
१२) चीनचे दु:खाश्रू - हो-हँग-हो नदी
१३) आसामचे अश्रू - ब्रह्मपुत्रा नदी
१४) बंगालचे अश्रू - दामोदर नदी
१५) मोत्याचे बेट - बहरीन (पर्शिशन गल्फ)

माणुसकीची किंमत...

प्रा.डॉ. रमेश तुकाराम परिहार

अमेरिकेतल्या एका आडबाजुच्या शहरातील आडबाजुला असलेल्या एका सामान्य हॉटेलात रात्रीच्या वेळी एक वृध्द जोडपे शिरले. बाहेर मुसळधार पाऊस चालु होता. थंड वादळी वारे वहात होते. प्रचंड थंडी पडली होती. अशा या थंडीत हे वृध्द जोडपे हॉटेलात शिरले तेव्हा थंडीने त्यांचे अंग थरथरत होते. कपडे पण थोडेसे पावसात भिजलेले होते. तसे त्यांचे कपडे सामान्यच होते. त्यावेळी हॉटेलच्या काऊंटरच्या मागे अगदी सामान्य असा दिसणारा एक निग्रो तरुण बसला होता.

''आम्हाला आजची रात्र राहण्यासाठी या हॉटेलात रुम मिळेल का?'' त्या म्हाताऱ्या आजीबाईंनी थंडीत कुडकुडत त्या निग्रो तरुणाला विचारले.

''सॉरी मॅम, आज हॉटेल मध्ये सगळ्या रुम्स फुल आहेत. एकही रुम शिल्लक नाही.'' त्या निग्रो तरुणाने सांगितले पण सांगतांना त्याचा चेहरा असा झाला होता की हॉटेलात एकही रुम शिल्लक नाही हा जणुकाही त्याचा अपराध असावा.

''बघाना काही जमते का ? हवे तर दुप्पट पैसे घ्या. बिल नाही दिलेत तरी चालेल.'' म्हातारबुवा म्हणाले. थोडक्यात त्या रुमचे पैसे त्या निग्रो तरुणाने खुशाल खिशात घालावेत असे ते म्हातारबुवा सुचवत होते. पण तो निग्रो तरुण त्यामुळे काही बघेल असे वाटे ना.

''हे बघा मी तुम्हाला माझी रुम देऊ शकतो. माझी रुम तशी छोटी आहे पण त्यात तुमची सोय होईल. मला जर १० मिनिटे वेळ दिलात तर मी माझी रुम जरा आवरुन येतो. तोपर्यंत मी तुम्हाला गरमागरम चहा आणुन देतो. त्यामुळे तुम्हाला थोडे बरे वाटेल'' असे म्हणून तो निग्रो तरुण किचनमध्ये चहा करायला गेला आणि थोड्याच वेळात वाफाळलेल्या चहाचे दोन कप आणि कुकीज घेऊन आला आणि आपली खोली साफ करायला निघुन गेला.

थोड्या वेळात तो निग्रो तरुण परत आला ते म्हतारबुवा आपल्या गाडीच्या डिक्कीतून एक जाडजुड बॅग काढत असतांना दिसले. ''थांबा मी तुम्हाला मदत करतो'' असे म्हणून तो निग्रो तरुण पुढे आला आणि तो बँग काढून हॉटेलमध्ये घेऊन आला.

''चला मी तुम्हाला तुमची रुम दाखवतो'', तो म्हणाला आणि त्या वृध्द जोडप्याला आपल्या रुमपाशी घेऊन आला.

''ही घ्या किल्ली ! काही लागले तर मला हाक मारा !'' तो निग्रो तरुण म्हणाला.

''तु कोठे झोपणार?'' त्या आजीबाईंनी विचारले.

''तुम्ही काळजी करु नका! मी बाहेर हॉलमध्ये झोपेन. माझ्याकडे स्लिपींग बँग आहे! गुड नाईट'' तो निग्रो तरुण म्हणाला.

आजीबाईंनी खोलीचे दार उघडले. खोली तशी लहानशीच होती पण व्यवस्थित आवरुन ठेवलेली होती. खोलीचे बाथरुम पण स्वच्छ करुन ठेवले होते. खोलीचा हिटर चालु करुन ठेवला होता. तसेच पलंगावर दोन इस्त्री केलेले नाईट गाऊन्स ठेवलेले होते. प्यायचे पाणी पण भरुन ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते वृध्द जोडपे फ्रेश होऊन बाहेर पडले. आता त्यांना निघायचे होते.

''किती पैसे झाले?'' त्या आजोबांनी विचारले. ''पैशांचे आपण नंतर बघु. आधी चांगला ब्रेकफास्ट करा ! मी तुमच्यासाठी ब्रेकफास्ट घेऊन येतो.'' असे सांगून तो निग्रो तरुण पॅन्ट्रिमध्ये गायब झाला आणि थोड्या वेळात आमलेट, टोस्ट आणि गरम कॉफी घेऊन आला.

''किती पैसे द्यायचे?'' त्या म्हाताऱ्याबुवांनी ब्रेकफास्ट झाल्यावर विचारले. ''त्याचे असे आहे. मी तुम्हाला माझी खोली वापरायला दिली. ती काही हॉटेलची खोली नव्हती. त्यामुळे त्याचे पैसे काही नाहीत.'' तो निग्रो तरुण म्हणाला.

''असे कसे? बर मग चहाचे आणि ब्रेकफास्टचे किती पैसे द्यायचे'', त्या आजीबाईंनी विचारले.

''मॅडम मला आई वडिल नाहीत. माझे आई वडिल माझ्या लहानपणीच गेले. तुम्हाला पाहीले आणि मला माझे आई वडिल आठवले. आज जर माझे आई वडिल या हॉटेलमध्ये आले असते तर मी त्यांच्याकडून चहाचे आणि नाश्त्याचे पैसे घेतले असते का? नाही ना! मग मला तुमच्याकडून पैसे नकोत'' तो निग्रो तरुण म्हणाला.

तो निग्रो तरुण काऊंटरजवळ गेला आणि आपल्या खिशातून काही पैसे काढून हॉटेलच्या गल्ल्यात टाकू लागला. म्हातारबुवा कुतूहलाने ते बघत होते. त्यांच्या लक्षात आले की त्यांनी जो चहा घेतला होता आणि ब्रेकफास्ट केला होता त्याचे पैसे तो निग्रो तरुण स्वत:च्या खिशातून हॉटेलच्या गल्ल्यात टाकत होता.

ते वृध्द जोडपे जायला निघाले. त्या निग्रो तरुणाने त्यांची जड बॅग त्यांच्या गाडीच्या डिकीत आणुन ठेवली. तेवढ्यात त्याची नजर रिकाम्या पाण्याच्या बाटल्यांकडे गेली. ''थांबा मी तुम्हाला पाणी आणुन देतो.'' असे म्हणून त्याने त्या दोन्ही बाटल्या स्वच्छ करुन पिण्याच्या पाण्याचे भरुन आणुन दिल्या. ते वृध्द जोडपे एकमेकांकडे बघत होते.

''हे पहा आम्हाला या ठिकाणी जायचे आहे. आम्ही या गावात नवीन आहोत. आम्हाला कसे जायचे हे सांगायला थोडी मदत करणार का?'' आजोबांनी विचारले.

''थोडे थांबा'' असे म्हणून तो निग्रो तरुण आत गेला आणि गावचा नकाशा घेऊनच बाहेर आला. त्याने तो नकाशा आजोबांना देतांना म्हणाला ''आता तुम्ही या ठिकाणी आहात. तुम्हाला जेथे जायचे आहे. हा बघा हा रस्ता तुम्हाला सरळ तेथे घेऊन जाईल.'' म्हातारबुवांनी बघितले. त्या निग्रो तरुणाने नकाशावर पेन्सिलने व्यवस्थित खुणा केल्या होत्या.

त्या आजीबाईने त्या निग्रो तरुणाचे आभार मानले, आणि म्हणाल्या, तुझे नांव काय? तुझे बिझनेस कार्ड असेल तर मला दे.

सॉरी मॅम! माझ्याकडे बिझनेस कार्ड नाही कारण मी सध्या टेम्पररी नोकरीवर आहे. पण हॉटेलच्या बिझनेस कार्डवर माझे नाव लिहून देतो. परत या बाजुला आलात तर आमच्या हॉटेलवर जरुर या ! असे म्हणत त्या निग्रो तरुणाने आपल्या खिशातून हॉटेलचे बिझनेस कार्ड काढले, त्यावर पेनाने आपले नाव लिहिले आणि ते कार्ड आजीबाईंना दिले.

पंधरा दिवस असेच गेले आणि त्या निग्रो तरुणाच्या नावाने एक भला मोठा लिफाफा पोस्टाने आला. तशी त्याला पत्रे वगैरे फारशी येत नसत. हा लिफाफा कोणाचा म्हणून त्याने उघडून बघितला. ओ किफे हॉटेलचे लेटर हेड बघून तो चमकला. ओ किफे ही त्याकाळची अमेरिकेतील अत्यंत नावाजलेली अशी

हॉटेल्सची साखळी होती. अमेरिकेतील बहुतेक लोक मोठ्या आणि महत्त्वाच्या शहरांमध्ये ही हॉटेल्स होती. बहुतेक हॉटेल्स पंचतारांकित होती. ओ कॅफे हॉटेल्समध्ये काम करायला मिळावे अशी अनेकांची इच्छा असायची. ओ कॅफे हॉटेलकडून कसले पत्र आले आहे हे बघावे म्हणून तो पत्र वाचु लागला आणि उडालाच. त्याला चक्क इंटरव्हयुचा कॉल आला होता. त्याच्या शहराजवळच ओ कॅफेचे एक नविन पंचतारांकित हाटेल सुरु झाले होते. तिथे त्याला इंटरव्हयुला बोलावले होते. पण आपण अर्ज केलेला नसताना आपल्याला इंटरव्हयुचा कॉल कसा आला याचे त्याला आश्चर्य वाटत होते.

तो इंटरव्हयुच्या दिवशी त्यातल्या त्यात चांगला पोशाख करुन आणि आपली फाईल घेऊन इंटरव्हयुला हजर झाला. या हॉटेलमध्ये आपल्याला वेटरची नोकरी मिळाली तरी पुष्कळ झाले असे त्याला वाटले. त्याने रिसेप्शन काऊंटरवर आपले इंटरव्हयुचे लेटर दिले. त्याला सांगण्यात आले की हॉटेलचे चेअरमनसाहेब स्वत: त्याचा इंटरव्हयु घेणार आहेत. त्याला आश्चर्यच वाटले. थोड्याच वेळात त्याला हॉटेलच्या सातव्या मजल्यावर असलेल्या चेअरमन साहेबांच्या ऑफीसमध्ये नेण्यात आले. त्याचे ऑफीस चांगले भव्य होते. थोड्याच वेळात त्याला आत बोलावण्यात आले. तो चेअरमन साहेबांच्या भव्य केबिनमध्ये शिरला त्याने समोर नजर टाकली आणि तो उडालाच.

चेअरमन साहेबांच्या डेस्कच्या मागे तेच वृध्द जोडपे बसले होते जे त्याच्या हॉटेलमध्ये आले होते.

''मी जॉन ओ किफे. या माझ्या पत्नी लिलियन ओ किफे. ओ किफे चेन हॉटेल्स आमच्या मालकीची आहेत.'' ते आजोबा म्हणाले.

''त्या दिवशी रात्री तू आम्हाला जी माणुसकीची वागणूक दिलीस त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत. हल्ली अशी माणुसकी बघायला सुध्दा मिळत नाही.'' आजीबाई म्हणाल्या.

''मला तुझ्यासारखी माणुसकीची जाण असणारी माणसेच माझ्या हॉटेलसाठी हवी आहेत. मी या हॉटेलच्या जनरल मॅनेजर पदासाठी तुझा विचार करतो आहे. तू आमच्या हॉटेलमध्ये जनरल मॅनेजर म्हणून जॉईन होशील का?'' ओ किफे साहेब म्हणाले.

''जनरल मॅनेजर!'' तो निग्रो तरुण चांगला उडाला होता, ''सर ! पण मी या पदासाठी लायक आहे का ? कारण माझे शिक्षण–''

''आम्ही तुझी सर्व माहिती काढली आहे. ओ किफे साहेब मधेच त्याला थांबवत म्हणाले, घरच्या परिस्थितीमुळे तुला काही फारसे शिक्षण घेता आले नाही हे आम्हाला कळले. तसेच तुझ्या काळ्या रंगामुळे पण तुला कुठे चान्स मिळत नाही हे पण आम्हाला समजते. पण माणुसकी काही शिकवून मिळत नाही. ती उपजतच असावी लागते. आम्ही शरीराचा रंग, जाती, धर्म असा भेद करत नाही. आम्ही माणसातील गुणवत्तेला महत्त्व देतो. त्या दिवशी रात्री आम्ही तुझी परीक्षा घेत होतो त्यात तू उत्तम मार्कांने पास झाला. जेव्हा तू आमच्या चहाचे आणि ब्रेकफास्टचे पैसे तुझ्या खिशातून हॉटेलच्या गल्ल्यात टाकलेस तेव्हाच आमच्या लक्षात आले की तू नुसताच प्रामाणिक माणूस नाहीस तर उत्तम च्यारित्र असलेला माणूस आहेस. आमच्या या हॉटेलच्या जनरल मॅनेजर म्हणून तुझे स्वागत आहे !'' ओ किफे म्हणाले आणि त्यांनी त्या निग्रो तरुणाशी शेकहॅन्ड केला.

कधी कधी माणुसकीची आणि कॅरेक्टरची अशी पण किंमत मिळते. (एक सत्य घटनेवर आधारीत)

*****

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती - एक सुंदर कथा

कु. प्रियंका पुरुषोत्तम रायपुरे
M.Sc. II (Chem.)

एका व्यापाऱ्याला बाजारात एक भव्य उंट विकत घ्यायचा होता आणि एक उंट निवडल्यानंतर त्या उंटाची किंमत ठरवण्यासाठी उंट विक्रेता व व्यापारी यांच्यात बोलणी सुरु केली.

व्यापारी आणि उंट विक्रेत्यामध्ये बऱ्याचदा करार झाला आणि शेवटी त्या व्यापाऱ्याने उंट विकत घेऊन घरी नेला. घरी पोहोचल्यावर व्यापाऱ्याने आपल्या नोकराला उंटाचा काजवा (खोगीर) काढण्यासाठी बोलावले. काजवेच्या खाली सेवकास एक लहान मखमली पिशवी सापडली ज्यामुळे उघडकीस आले की ते मौल्यवान हिरारत्नांनी परिपूर्ण आहेत. ''बॉस, तू एक उंट विकत घेतला, परंतु त्याबरोबर काय विनामूल्य आहे ते पहा !''

व्यापारी देखील आश्चर्यचकित झाला, त्याने आपल्या सेवकांच्या हातात हिरे पाहिले. ते सूर्यप्रकाशामध्ये आणखी चमकत होते. व्यापारी म्हणाले, ''मी उंट खरेदी केला आहे, हिरे नव्हे, मी ते त्वरीत परत करावे.''

नोकर मनात विचार करत होता, ''माझा बॉस किती मूर्ख आहे...!'' तो म्हणाला, ''मालक, कोण आहे हे कुणालाही कळणार नाही!'' तथापी, व्यापाऱ्याने त्याचे ऐकले नाही आणि ताबडतोब बाजारपेठेत पोचले आणि मखमलीची पिशवी त्या दुकानदाराला परत केली. उंट विक्रेता खुप खुश झाला, म्हणाला, ''मी विसरलो होतो की माझे मौल्यवान दगड काजवेखाली लपवले होते. आता आपण बक्षीस म्हणून कोणताही एक हिरा निवडा ।''

व्यापारी म्हणाला, ''मी उंटासाठी योग्य किंमत दिली आहे म्हणून मला कोणत्याही भेटवस्तू आणि बक्षिसाची आवश्यकता नाही.'' जितका व्यापारी नकार देत होता, तितकाच उंट विकणारा आग्रह करत होता. शेवटी, व्यापारी हसला आणि म्हणाला, ''खरं तर मी बॅग परत आणण्याचा निर्णय घेतला तेव्हा मी दोन मौल्यवान हिरे आधीच माझ्याकडे ठेवले होते.'' या कबुलीजबाबानंतर उंट विक्रेता खूप चिडला आणि त्याने पटकन बॅग रिकामी केली आणि त्याचे हिरे मोजले । पण जेव्हा त्याला लक्षात आले की त्याचे सर्व हिरे जसेच्या तसे आहेत अन एकही हिरा कमी झालेला नाही तेव्हा तो म्हणाला, हे माझे सर्व हिरे आहेत, तर मग तुम्ही ठेवलेले दोन सर्वात मौल्यवान गोष्टी कोणत्या होत्या?

व्यापारी म्हणाले, माझा प्रामाणिकपणा आणि माझा स्वाभिमान

विक्रेता मुक होता. यापैकी २ हिरे आपल्याकडे आहेत की नाही हे शोधण्यासाठी आपण स्वत: मध्ये पहावे. ज्याच्याकडे हे दोन हिरे आहेत, स्वाभिमान अन प्रामाणिकपणा आहे तो जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे.

विश्रांतीचा अपराध...

कु. भाग्यश्री भानुदास चोपडे
M.Sc. I

स्त्रीला निसर्गत: विश्रांतीची गरज असते, ती दुबळी नसते पण तिची यंत्रणा वेगळ्या पध्दतीनं काम करत असते. एक तास अभ्यास करुन ६0% मिळत असतील तर दोन तास अभ्यास करुन १२0% मिळणार नाहीत हे आपल्याला कधी कळणार ?

पुरुषांकडे पाहून तुलना करत स्वत:ला आळशी समजणं म्हणजे स्वत:ला त्रास देणे आहे, पुरुषाच्या वेळापत्रकात मासिकधर्म नाही, त्याच्या आयुष्यात बाळंतपण नाही, मुलांची आई होणं नाही तरीही विश्रांती घेतांना मात्र स्त्रीच्या मनात अपराधी भाव असेल तर गंभीरपणे विचार करायची वेळ आलेली आहे.

स्त्री हक्कांसाठी लढता लढता विश्रांतीचा हक्कच दुर्लक्षित राहीलाय, कदाचित सुपरवुमन होण्याच्या नादात तिचं स्वत:चच दुर्लक्ष झालयं, बिरबलाच्या गोष्टीतल्या बाभळी आणि बोरी वेगळ्या असतात हे विसरुन इतरांना कॉपी करतांना स्वत:च्या गरजा, मर्यादा, वेगळेपण ती विसरतेय.

सेलिब्रिटीज वरचे सिनेमे, सोशल मिडियावरचे मोटिवेशनल स्पिकर यशाचे फॉर्म्युले सांगत असतात. या जगात कष्टाचे गोडवे गाण्याची जुनी प्रथा आहे, सहज यश मिळालं म्हटलं की, त्यात मजा नसते, ड्रामा नसतो, टिव्हीवरचे रियालिटी शोज बघा, घरची गरीबी दाखवुन केलेला फ्रेम केलं जातं का?

कलाकार हा कलाकार असतो त्याच्या बँकग्राऊंडशी तुम्हाला काय करायचंय ? पण नाही?

आपल्याला साधं सरळ यश पचत नाही. आपण यशाचा संबंध टॉर्चरशी जोडलेला आहे, मग तसचं आपल्या अंतर्मनाचं प्रोग्रॅमिंग होतं. आपण इतराचं पाहतो, लॉक ऑफ अट्रॅक्शन नुसार कष्ट आणि अडचणी मागतो मग यश मिळाल्यावर ते दु:ख मिरवतो सुध्दा आपलं मन सहज सोपा मार्ग नाकारतं हे अनकॉन्शस लेवलला चाल्लेलं असल्यानं कळतही नाही, परत प्रश्न विचारत फिरतो की माझ्या मार्गात इतक्या अडचणी का आहेत ?

कारण बिलिफ, मनात खोलवर रुजलेलं कष्टाचं व्यसन । यशस्वी लोकं जे बोलतात ते पूर्ण नसतं, बाह्यमन १0% असतं, अंतर्मनाचं गूढ ९0% असतं, मग यशाची सूत्रं विचारली की ते कष्ट सांगतात. त्यांनी स्वत:वर प्रेम केलं, स्वत:ला महत्त्व दिलं, हवा तेव्हा आराम केला हे सांगतील तर त्यांच्यावर विश्वास कोण ठेवेल ? मी सहज गेले आणि जिंकले म्हटलं तर कोण ऐकेल? आपल्याला वेदना ऐकायच्या असतात, डोळ्यात पाणी आलं पाहीजे.

का? तर उद्या आपल्याला पळ काढायचा असेल किंवा अपयश आलं तर आपले कष्ट कमी पडले असं म्हणता यावं, कारण अहंकार स्वत:चे दोष तर पहातच नाही तो शरीराला दोष देऊन मोकळा!

ऐकलयं कधी पालकांना बोलताना, मुलगा/मुलगी हुशार आहे हो फक्त कष्ट कमी पडतात!

विश्रांतीच्या शुभेच्छा...

सौ. संगिता भारंबे
ग्रंथालय विभाग

आपला न्यूनगंड आपल्याला सुखानं बसू सुध्दा देत नाही. माझी किंमत मला सिध्द करावी लागेल कामं करुन तरच मी आहे असं आपल्याला वाटतं, यु ट्युब वरचे स्त्रियांचे व्हिडीओ पहा, तव्याच्या काळ्या कडा कशा चमकवायच्या पासून अमक्यापासून तमुक तयार करण्याचे भरमसाठ दिव्य आहेत. मुलांच्या संगोपनावर तर आयुष्य संपलं तरी शिकणं संपत नाही इतका आईला गिल्ट असतो आपण चांगली आई नाही च असचं वाटत असतं, कधी विचार केलाय? का? कशासाठी?

कारण स्वत: बद्दल खोलवर मुरलेला न्यूनगंड! मी गृहिणी आहे तर आहे, आराम करतेय, मला नाही येत एखादी कला, नाही जमत इतरांसारखं, काय हरकत आहे साधं रुटीन आनंदानं जगायला?

आयुष्यभर सासरचं केलं, माहेरचं केलं, मुलं शिकली यशस्वी झाली, धाव धाव धावले आता आणखी काय? अजूनही किंमत कुठे आहे? आता मी सोशल मिडियावर पाहीन कुणी गृहउद्योग करतेय, कुणी कला शिकतेय, कुणी आता मी स्वत:ला फटके मारेन, स्वत:ला युसलेस म्हणत परत धावायला सुरुवात करेन, त्याला स्वत:ची ओळख वगैरे छानसं नाव देईन आणि दमलेली थकलेली परत नवी रेस शोधून काढेन, ताजं फ्रेश दिसण्यासाठी मेकअप करेन, हसेन.

कुठेतरी हे थांबवा, स्वत:ला फसवणं, आपल्याला इतरांचं अप्रुवल हवं असतं, सारखं काहीतरी करुन, त्यासाठी आपण गिल्ट न बाळगता निवांत बसतही नाही, शांत बसून शरीराला आराम देण्याच आपल्याला माहीत नाही. नुसतं बसायचं दहा मिनिटं ? असं कसं ? ध्यान करु, मंत्र म्हणू पण काहीतरी करु ! सतत काहीतरी केलंच पाहीजे या प्रोग्रॅमिंगमधून आपण बाहेर पडलं पाहीजे.

शरीराचं ऐकलं पाहीजे, ते बोलत असतं, अंग दुखतयं, कंबरेत वेदना आहे, खांदा ठणकतोय, ते एका लहान मुलासारखं आई आई करतयं पण आई लक्ष देत नाही, एक दिवस ते टाहो फोडतं जोरात रडतं, शरीराचा आक्रोश म्हणजे आजारपण ! तेव्हा शरीराकडे लक्ष जातं, औषधाचा पैसा खर्च करुन आपण विकत काय घेतो तर सक्तीची विश्रांती !

बरं होऊन आपण परत जुन्या कामाला लागतो. आराम करता आला पाहीजे, वाचणाऱ्या प्रत्येकीला गिल्टी फ्री विश्रांतीच्या शुभेच्छा...

पिशवीभर आनंद...

प्रा.डॉ. रमेश तुकाराम परिहार

शुक्रवारी संध्याकाळी शहराच्या साधारण मध्यभागी असलेल्या एका मॉलमध्ये एक प्रौढ दांपत्य खरेदीला आले होते. खरं तर आता दोघेच असतात घरी, फारशा वस्तू लागत नाहीत पण थोडा वेळ जाईल, कंटाळवाणा रुटीनमध्ये थोडा बदल होईल म्हणून त्यांनी शुक्रवारचा दिवस निवडला होता.

शनिवार रविवारच्या गर्दीत त्यांना अस्वस्थ वाटायचे. सवयीने एक ट्रॉली घेऊन त्यांनी रॅकवर असलेल्या वस्तूंवर नजर टाकायला सुरुवात केली. त्याचवेळी त्याचे लक्ष आजुबाजुच्या खरेदी करीता आलेल्या लोकांवर होते. त्याचे लक्ष वेधून घेतले ते त्यांच्यापेक्षा लहान दांपत्याने.

ते दोघे खरेदीत मश्गुल झाले होते. आवडलेली एखादी वस्तू शेल्फमधून त्याची किंमत, माहिती वाचून ते बहुधा वस्तू घ्यायची की नाही हे ठरवत होते. एखादी गोष्ट बजेटच्या बाहेर आहे असे जाणवले की किंचीत नाराज होऊन ती वस्तू परत नीट जागेवर ठेवत होते.

ज्येष्ठ दोघांनी हे सगळं टिपले आणि आपसात एकमेकाकडे बघून हसले. जेष्ठ दांपत्याला आपले नवशिकेपणाचे दिवस आठवले. एकेक रुपया खर्च करतांना विचारपूर्वकच ठरवावे लागायचे असे ते दिवस होते. काय वाटले कोणास ठाऊक, ते दोघे त्या वयाने लहान नवरा बायकोकडे चालत गेले.

''नमस्कार, आपण ओळखत नाही एकमेकांना, माझ्याकडे या मॉलचे दोन हजार रुपयाचे एक फ्री कुपन आहे. त्याची मुदत चार दिवसात संपणार आहे, आम्हाला काही खरेदी करायची नाही तर तुम्हाला ते कुपन दिले तर चालेल का ?'' समोरुन साहजिकच प्रश्न आला, ''त्या बदलत्यात आम्हाला किती पैसे भरावे लागतील?'' ''दोन हजारापर्यंत काहीच नाही, त्याहून जास्त खरेदी झाली तर मात्र वरचे पैसे भरावे लागतील'' ज्येष्ठ जोडप्यातल्या नवऱ्याने शंका समाधान केले. तरुण दांपत्याला आश्चर्य वाटले. त्यातली बायको म्हणाली, ''आम्हालाच का देताय हे कुपन?'' ''मला वाटलचं तुम्हाला हा प्रश्न पडणार... कारण मगापासून आम्ही तुम्हाला बघतोय, आमचे सुरुवातीचे दिवस आठवले, आम्ही पण असेच टॅग बघून खरेदी केली अनेक वर्षे ! हे पहा, तुम्हाला फसवायचा, त्रास देण्याचा हेतू नाही पण वापरले नाही तर हे कुपन अगदी वाया जाईल म्हणून देतोय तुम्हाला. या बदल्यात तुमची खरेदी झाली की आपण शेजारी आईस्क्रीम शॉप आहे तिथे भेटू'', ''चालेल?'' ज्येष्ठ स्त्रीने तोडगा काढला.

तरुण जोडप्याने एकमेकांकडे पाहिले आणि ते कुपन घेऊन ते खरेदीकरिता वळले ज्येष्ठ जोडपे कॅश काऊंटरच्या दिशेने निघाले. तरुण जोडप्याची चर्चा सुरु झाली, काय घ्यावे? त्यांना गॅसची शेगडी घ्यायची होती, घरची जरा बिघडलीच होती. ती दोन हजारात नसती आली, मग कपडे वाळत टाकायचा स्टँड तो ही महाग होता. बराच काथ्याकुट झाल्यावर नवरा म्हणाला, ''सरळ वाण सामान घेऊन जाऊ.'' त्याचे म्हणणे खोडत बायको म्हणाली, ''तेवढं आपण दोघे आरामात कमावतो, आता अशा गोष्टी घेऊ ज्या सहसा आपण घेणार नाही.'' नवऱ्याला लगेच पटली ही कल्पना. दोघांनी पटपट यादी करायला सुरुवात केली. मुलांसाठी मोठ्या रंगपेट्या, शाळेचे लेखन साहित्य, चॉकलेट, सुकामेवा, मुलांच्या आवडीचा खाऊ, स्वयंपाक घरात लागणारे लाकडी उलथन, डाव, मसाले असे बरेच काही घेतांना ते सतत बेरजा

करत होते.

दोघांना मजा आली खरेदी करताना. कॅश काऊंटरवर वस्तू मोजून घेतांना त्यांच्या लक्षात आले एक मोठी पिशवी छोट्या छोट्या वस्तूंनी भरुन गेली होती. दोघं आनंदी चेहऱ्याने बाहेर आले. समोर ते दांपत्य होतेच. चौघे आईसस्क्रीम शॉपमध्ये बसले. ऑर्डर दिली. आईसस्क्रीम खाताखाता ज्येष्ठ दांपत्यातला नवरा म्हणाला, पोरांनो, ऐकाल माझे? दोघे कान टवकारुन ऐकू लागले. आज तुम्हाला अचानक खरेदीचा योग आला. जर महाग गोष्ट घेतली असती तर एकच आली असती, पण बघा आज तुमच्या पिशवीत लहान लहान गोष्टी आहेत. त्या तुम्हाला थोडया काळासाठी का होईना खूप आनंद देणार आहेत आणि जन्मभराच्या आठवणीदेखील आपले आयुष्य असचं आहे एक महागाची मोठी गोष्ट परवडत नाही म्हणून खट्टू होऊन जगण्यापेक्षा पिशवीभर छोटे आनंद जगायला काय हरकत आहे?

मोठी ध्येय असावीत पण त्यामागे धावताना रोजचे छोटे आनंद तेवढे निसटू देऊ नका. सॉरी बरं का, एकदम प्रवचनच दिले मी तुम्हाला असे म्हणत दोघे उठले आणि गेटकडे निघाले देखील. तरुण जोडप्याला धन्यवाद म्हणायचा वेळही न देता. ते दोघे भानावर आले तेव्हा त्यांना जाणवले, अरे ते दोघे उतरले बघ.

बायको म्हणाली तोवर ते दोघे जेष्ठ खाली उतरले पण होते. "उतरले ग ते । साध थँक्यू पण म्हटले नाही आपण... नवरा काळजी नको करु.... बायकोने नवऱ्याला आश्वस्त केले."

त्यांना जाणवले खूप मोठा धडा शिकलोय आपण. तो पिशवीभर आनंद घेऊन आपल्या घराकडे ते आनंदाने निघाले.

दु:खी माणूस

कु. वैष्णवी घोंगटे
B.Sc. I (Bio)

एक व्यापारी होता, तो एका ट्रकमध्ये तांदळाची पोती घेऊन जात होता. एक पोते घसरले आणि ट्रकमधून खाली पडले. थोड्याच वेळात तिथे काही मुंग्या आल्या आणि त्यांनी १०-२० दाणे घेतले, परत काही उंदीर आले आणि त्यांनी १००-५० ग्रॅम खाल्ले आणि निघून गेले, परत तिथे काही पक्षी आले त्यांनी सुध्दा थोडे खाल्ल्यानंतर तिथुन उडून गेले, परत तिथे काही गायी आल्या २-३ किलो खाल्ल्यानंतर त्या सुध्दा तिथुन निघून गेल्या आणि मग परत तिथे एक माणूस आला आणि त्याने संपूर्ण पोतेच गडबडीने उचलून घेतले आणि घरी घेऊन गेला.

सृष्टीतील इतर सर्व प्राणी पोटासाठी जगतात, परंतु माणूस प्राणी स्वार्थासाठी जगतो. म्हणूनच सर्वकाही जवळ असूनही सर्वात दु:खी व असमाधानी फक्त माणूसच आहे.

आवश्यकतेनुसार स्वत:च्या इच्छेवर माणसाने नियंत्रण ठेवले पाहीजे, नाहीतर नको त्या इच्छा वाढत जातात आणि परत दु:खाचे कारण बनून समोर येतात.

गेट टुगेदर चे महत्त्व...

कु. क्षितीजा विजय सराफ
M.Sc. I (Chem.)

वरचेवर मित्रांच्या, मैत्रीणींच्या संपर्कात जरुर रहा मनसोक्त पैसे वेळ खर्च करा. आयुष्य मर्यादित आहे आणि जीवनाचा जेव्हा शेवट होईल तेव्हा इथली कोणतीच गोष्ट आपल्या सोबत नेता येणार नाही!

मग जीवनात खूप काटकसर कशासाठी करायची? आवश्यक आहे तो खर्च केलाच पाहीजे ज्या गोष्टीतून आपणांस आनंद मिळतो त्या गोष्टी केल्याच पाहिजेत.

आपण गेल्यानंतर पुढे काय होणार याची मुळीच चिंता करु नका. कारण आपला देह जेव्हा मातीत मिसळून जाईल तेव्हा कुणी आपले कौतुक केले काय किंवा टिका केली काय?

जीवनाचा आणि स्वकष्टाने मिळवलेल्या पैशाचा आनंद घेण्याची वेळ निघून गेलेली असेल..!

तुमच्या मुलांची खूप काळजी करु नका. त्यांना स्वत:चा मार्ग निवडू द्या. स्वत:चे भविष्य घडवू द्या. त्यांच्या इच्छा आकांक्षाचे आणि स्वप्नांचे तुम्ही गुलाम होऊ नका. मुलांवर प्रेम करा त्यांची काळजी घ्या, त्यांना भेटवस्तूही द्या.

मात्र काही खर्च स्वत:वर स्वत:च्या आवडी निवडीवर करा. जन्मापासून मृत्यूपर्यंत नुसते राबराब राबणे म्हणजे आयुष्य नाही हे देखील लक्षात ठेवा. तुम्ही साठित आहात आरोग्याची हेळसांड करुन पैसे कमवण्याचे दिवस आता संपले आहेत.

पुढील काळात पैसे मोजून सुध्दा चांगले आरोग्य मिळणार नाही. या वयात प्रत्येकापुढे दोन महत्त्वाचे प्रश्न असतात. पैसा कमवणे कधी थांबवायचे आणि किती पैसा आपल्याला पुरेल. तुमच्याकडे शेकडो हजारो एकर सुपीक शेतजमीन असली तरी तुम्हाला दररोज किती अन्नधान्य लागते? तुमच्याकडे अनेक घरे असली तरी रात्री झोपण्यासाठी एक खोली पुरेशी असते.

एक दिवस आनंदा शिवाय गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही गमावला आहात एक दिवस आनंदात गेला तर तुम्ही आजारापासून बरे व्हाल आणि तुम्ही कायम प्रफुल्लीत असाल तर तुम्ही आजारी पडणारच नाहीत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आजुबाजुला जे जे उत्तम आहे. उदात्त आहे त्याकडे पहा. त्याची जपवणूक करा आणि हो, तुमच्या मित्रांना/मैत्रीणींना कधीही विसरु नका त्यांना जपा. हे जर तुम्हाला जमले तर तुम्ही मनाने कायम तरुण रहाल आणि इतरांनाही हवेहवेसे वाटाल. मित्र-मैत्रीण नसतील तर तुम्ही नक्कीच एकटे आणि एकाकी पडाल. त्यासाठी दररोज व्हाटस्अपच्या माध्यमातून संपर्कात रहा हसा, हसवत रहा, मुक्त दाद द्या. म्हणूनच म्हणतो, आयुष्य खूप कमी आहे ते आनंदाने जगा... प्रेम मधुर आहे त्याची चव चाखा...! क्रोध घातक आहे त्याला गाडून टाका ! संकटे ही क्षणभंगुर आहेत त्यांचा सामना करा..!

डोंगराआड गेलेला सूर्य परत दिसू शकतो पण...माथ्या आड गेलेले जिवलग परत कधीच दिसत नाहीत... मित्र जपा मैत्री जपा । जमेल तसं जमतील तेव्हा मात्र गेट टुगेदर करीत रहा.

खरे भाग्यवंत....

प्रा.एस. व्ही. बोरले
वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख

वटारलेले डोळे पाहून दबणारी बायकोच आत डोळे वटारुन पाहू लागली की समजून जावे की, पृथ्वीवरील आपले अवतारकार्य शेवटच्या टप्प्यात आहे.

कमावत्या मुलांच्या आवाजात कडकपणा आला असेल तर समजून घ्यावे, की आपण आता कौटुंबिक जबाबदारीतून हळूहळू अंग काढून घ्यावे.

बसल्या बसल्या ह्या तुरीच्या शेंगातील दाने काढा, असे जेव्हा सुनबाईने म्हटले तर समजून घ्यावे की, बॉस नावाचे पद यांनी खारीज केले आहे.

वय वर्ष ६० नंतर कुणी आपल्याशी चांगले वागेल का ही अपेक्षा ठेवु नका. भाऊबंदकीचे नाते कुटूंबाचे फाळणी बरोबरच संपुष्यात आले, नातेवाईक पैसे देणे/घेणे वादातून संपले, पत्नीचा ओढा न कळत न टिकणाऱ्या मुलांच्या नात्याकडे वळू लागला. कार्यप्रसंगात नातेवाईक भेटतात, केवळ रामराम होतो, फारसी चौकशी होत नाही, तुम्ही मात्र मनात उजळणी करत असता, ह्याला मी शेत घेण्यास पैसे दिले होते.

सगळे कटू अनुभव जमा झाले असतील, कुणी नाही कुणाचे हा अनुभव गर्द झाला असेल. नाते बिघडली, संबंध बिघडले, वाट्याला एकटेपण आले, आता कुणाचे फोन येत नाहीत, दुखावलेले मन कुणाला फोन कर असेही म्हणत नाही. तरीपण एक नात अजुन टिकेल आहे, एक फोन चालु आहे, ते नात मुलीच, तितक्यात मुलीचा फोन येतो, ती विचारते... बाबा गेले होते का दवाखान्यात ? काय म्हणाले डॉक्टर? जेवण झालं काय ? ना ना प्रश्न काळजीचे, आस्थेचे विचारन, जिव्हाळ्याचे हेच एकमेव नात.

थोडा पश्चातापही होत असतो, मुलीसाठी काहीतरी करण्यात मी कमी पडलो, तिने मात्र संपत्तीचा वाटा भावासाठी मागितला नाही, भलेही भावु तिच्याशी फोनवर बोलत नसला तरीही. लोक मुलगा झाला की स्वत:ला भाग्यवंत समजतात, मला असे वाटते ज्यांना मुली आहेत ते खरे भाग्यवंत होत. एरवी तिन मुल जेव्हा वडिलांना कुणाकडे ठेवण्यावरुन भांडत असतात तेव्हा झालेली चूक सुधारण्या पलिकडे गेलेली असते.

*****

छंद....

प्रा. दिपक झोपे
भौतिकशास्त्र

छंद म्हणजे स्वत:ची लय. छंद म्हणजे स्वत:चा शोध. छंद म्हणजे स्वत:चा आणि इतरांचाही आनंद. खरचं आपल्या आवडी-निवडींना. आंतरिक उर्मींना आयुष्यात जागा द्यायला हवी. कोणत्याही वयात एक तरी छंद जोपासायला हवा. कारण तीच आपली खरी ओळख असते. त्यातूनच आपल्याला खरं समाधान मिळत असतं.

आजच्या धकधकीच्या, धावपळीच्या जीवनात छंद आपल्याला आनंद मिळवून देतात. एकच छंद जोपासणे ही एका अर्थाने अघवड कला असते. छंद असणे हे एक वेगळे रसायनच असते.

छंद म्हणजे काय ? काहीजण म्हणतात की ही फावल्या वेळी करायची गोष्ट... रिकाम्या वेळेचा विरंगुळा. पण खरे तर छंद हीच तर आयुष्यात करायची मुख्य गोष्ट. पुढे मग पोट भरण्यासाठी नोकरी, शिक्षण वगैरे करावं लागतंच. पण आपल्याला खरी ओळख मिळते. जगण्याचा अर्थ मिळतो आणि समाधानही मिळतं ते अशा छंदामधून.

छंदांनी माणसाला ओळख मिळते. माणसालाच छंद असतात. छंद माणूसपण टिकवतात. माणसाला स्वत:ला शोधण्याची. स्वत:ला व्यक्त करण्याची संधी देतात. जगण्यावर प्रेम करायला शिकवतात. तेव्हा आपले जे काही छंद असतील त्यांना न्याय द्यायला आत्ताच सुरुवात करा.

रुपांतर...

कु. पुजा जाधव M.Sc. (II)

गाण्यातून अंतरंगात जे नेतात ते सूर
अनुभवातून वाक्यात आणि वाक्यातून डोळ्यात
जी चमकते ती बुध्दी...
वर्दीतून निश्चयात आणि निश्चयातून सिमेवर
उभे असते ते धैर्य...
एकांतातून शांततेत आणि शांततेतून आनंदात
जो लाभतो तो आत्मविश्वास....
सुयशातून सातत्यात आणि सातत्यातून ऐश्वर्यात
बहरते ती नम्रता...

स्पर्शातून आधारात आणि आधारातून अश्रुत
जी ओधळते ती माया....
ह्रदयातून गालावर आणि गालावरुन स्मितेत
जे तरंगते ते प्रेम....
इच्छेतून हक्कात आणि हक्कातून शब्दात
जी उमटते ती खात्री....
स्मृतीतून कृतीत आणि कृतीतून समाधानात
जी दिसते ती जाणीव....
मनातून ओठावर आणि ओठातून पुन्हा मनात
जाते ती आठवण....

***

झेप...

कु. जयश्री गायगवळी M.Sc. (II)

कसेबसे सूर लावून
गाण गाता येईल ?
जुन्या झाल्या नात्यालाही
नवे करता येईल ?

उमजत जातं काहीसं
हलके हलके नव्याने
ओंजळीतून झटणारा
तो क्षण धरता येईल ?

नाजुकपणे अंकुरतं
भुईमधून एक बाळ
आभाळा कधी त्याला
माझं म्हणता येईल ?

चौकटीत पाय अडके
उंबरठ्यावर मन !
क्षितीज्याच्या पार कधी
झेप घेता येईल ?

****

झेप वार्षिकांक 2021

खरा आदर्श.....

कु. सुजाता खोडके B.Sc.I (Bio.)

कधीही शाळेत न गेलेले छत्रपति स्वराज्य निर्माण करतात.

जातीय व्यवस्थेमुळे अपमान सहन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताची राज्यघटना लिहितात.

आईचे प्रेम आणि बापाचे छत्र नसलेला बराक नावाचा पोर अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होतो.

पेट्रोलपंपावर काम करणारे धीरुभाई करोडोंचे साम्राज्य उभे करतात.

कॉलेजच्या प्रवेश फी साठी पैसे नाहीत म्हणून बहिणीचे दागिने गहाण ठेवणारे अब्दुल कलाम राष्ट्रपती पदापर्यंत जातात.

रोजगार हमीच्या कामावर जाणारे आर.आर.पाटील राज्याचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री होतात.

सत्तावीस वर्ष तुरुंगात काढणारे नेल्सन मंडेला जगाला प्रेम शिकवितात.

कुठलीही शारीरिक हालचाल न करु शकणारे स्टीफन हॉकिंग जग हलवणारे संशोधन करतात.

****

अनमोल जीवन...

कु. धनश्री नारखेडे B.Sc. I (Bio.)

गुंठा गुंठा करुन काही होत नाही.
जाताना सोबत काहीच नेत नाही.
कितीही कोरले बांध भूक कधी संपत नाही
मेल्यावरही माणसाची संपत्ती कधी कामी येत नाही.
काळी आई इथेच राहणार आहे तुम्ही इथे राहणार नाही.
मेल्यावर सातबाऱ्यावर नाव सुध्दा राहणार नाही.
नशिबात आहे त्यापेक्षा जास्त कधीच मिळणार नाही.
ज्याच्याकडे खूप आहे त्याला सुखाने अन्न गिळत नाही.
जपून रहा माणसा कारण आयुष्य पुन्हा मिळत नाही.

****

माणुसकी...

आकांक्षा पाचपोळ B.Sc.II (CBZ)

अरे भल्या माणसा
तू विसरला कशी माणुसकी
दोन पैशाच्या हव्यासापायी
तू खेळतो आहेत जीवनाशी
माणुसकी या शब्दातही
खरंच गंमत आहे फार
जीवन जगतांना माणुसकीचे
झाले आहे बंद दार
प्रेम जिव्हाळ्याच्या नात्यातही
माणुसकी विरुन गेली
मी श्रीमंत तू गरीब
या शब्दांनीही किमया केली
अरे माणसा माणुसकी
तू जप आता तरी जरा
जीवन जगत असतांना
यशस्वी होशील खरा !

आता तर हद्दच पार झाली गणिताची...

कु. अदिती पु. राणे B.Sc. (III) CPS

गणित विषयामध्ये सुत्रे पाठ होण्यासाठी उखाणा उपक्रम.

१) महादेवाच्या पिंडीसमोर उभा आहे नंदी
आयताचे क्षेत्रफळ = लांबी x रुंदी
२) हिमालयातील काश्मीर म्हणजे भूलोकातील स्वर्ग
चौरसाचे क्षेत्रफळ म्हणजे बाजूंचा वर्ग
३) देवीची ओटी भरु खणानारळाची,
त्रिकोणाचे क्षेत्रफळ = १/२ x पाया x उंची
४) स्वातंत्र्याची पहाट म्हणजे १९४२ ची चळवळ
(सहा बाजु) वर्ग ..... हे घनाचे पृष्ठफळ
५) तीन पानांचा बेल त्याला येते बेलफळ
लांबी x रुंदी x उंची.... हे इष्टिकाचितीचे घनफळ
६) जुन्या हजार पाचशेच्या बंद झाल्या नोटा
खरेदी वजा विक्री बरोबर होईल तोटा
७) मी आणि माझे विद्यार्थी दररोज खातो काजू...
चौरसाची परिमिती = ४ x बाजु
८) खोप्यात खोपा सुगरणीचा खोपा
विक्री वजा खरेदी बरोबर होईल नफा
९) दहा किलो म्हणजे एक मण...!!
घनाचे घनफळ बाजूचा घन...!!
१०) जीवाला जीव देतो तोच खरा मित्र गणित सोडवायला माहिती हवीत गणिताची सुत्र
११) सम आणि व्यस्त हे चलनाचे प्रकार
पहिल्यात असते गुणोत्तर तर दुसऱ्यात गुणाकार
१२) गोड म्हणजे स्वीट कडू म्हणजे बीटर
एक घनमीटर म्हणजे...एक हजार लीटर..!!
१३) रविवार नंतर सोमवार येतो, रविवार नंतर सोमवार येतो.....
प्रत्येक ऋण संख्येचा वर्ग...नेहमीच घन होतो
१४) महादेवाला आवडते बेलाचे पान...
कोणत्याही त्रिकोणात एक बाजू... दोन बाजुच्या बेरजेपेक्षा लहान...!
१५) दोनचा वर्ग चार...!! चार चा वर्ग सोळा...!!
गणिताचे उखाणे घ्यायला, ग्रुप झाला गोळा

आई...

निखिल वि. पाटील M.Sc. II

डोळ्यात बघुन जी मनातलं ओळखते
ती फक्त आणि फक्त आईचं असते
घरात स्वयंपाक कमी असते
तेव्हा एकाच व्यक्तीला भुक नसते, ती आई असते
अनेक चेहरे बदलतांना पाहीले
आईला मात्र प्रत्येकवेळी प्रेम करतांना पाहीले
जगातील प्रेम नश्वर आहे
फक्त आईच्या प्रेमातच ईश्वर आहे
सर्व गुन्हे माफ करणार
एकच न्यायालय ते म्हणजे आईचं हृदय
आईच्या प्रेमात काय जादु असते
तिने फिरवलेल्या हाताने जखम सुध्दा बसते
आपल्या नशीबात कधीच दु:ख नसते
जर नशीब लिहायचं काम
आपल्या आईच्या हाती असते.
बऱ्याच नात्यात नफा-तोटा दिसतो,
आईच्या नात्यात मात्र नि:स्वार्थ भाव असतो
थांबली तर चंद्रासारखी चालली तर वाऱ्यासारखी
ती आईच असते जी उन्हात सुध्दा
सावली सारखी
ईश्वराची भक्ती केल्याने आपल्याला
आई नाही मिळणार
पण आईची सेवा केल्याने ईश्वर नक्की भेटणार

****

मी मिसेस कोरोना....

कु. अदिती पु. राणे B.Sc. (III) CPS

मी मिरवणार.
समद्यांची जिरवणार
ऑडी बी जागेवर
मर्सिडीज बी जागेवर
मोर लांडोर नाचताहेत
त्यांच्याच टपावर
फाईव्हस्टार वाल्यांची बोलतीच बंद
मी मिऱ्या वाटणार राजकारणांच्या डोक्यावर मी मिरवणार.
अन समद्यांची जिरवणार.
गरीब श्रीमंत एकत्र जेवणार.
जात पात न जुमानता
प्रेतं एकत्र जळणार
भाजी पाल्यासाठी रांगच रांग.
मेड आहेत म्हणून मिरवणाऱ्या
धुणी भांडी करणार.
सगळा माज इथच उतरवणार.
मी मात्र मिरवणार.
समद्यांची जिरवणार.
दाग दागिने,
कपडे कपाटातच रडणार
चड्डी न बरमुडा गालातच हसणार
लुबाडलेल्या जमिनी हिरव्यागार होणार.
स्वच्छ आभाळ वसुंधरेच्या प्रेमात पडणार.
घाबरुन समदे घरातच बसणार.
मी मात्र मिरवणार
समद्यांची जिरवणार.
हिरो हिरोइनचा मेकअप उतरणार
सेलीब्रिटी म्हणवणाऱ्यांना फरशी पुसाया लावणार
किटी पार्टीवाल्या पोळ्या लाटणार आणि नेल स्पा वाल्या झाडु पोछा करणार.
मी तोऱ्यात मिरवणार.
अन् तुम्हा समद्यांची मात्र जिरवणार.
दारुवाले सरबत पिणार
पिझ्झावाले भाकरी खाणार.
वाढदिवस साजरे घरातच होणार.
मी नाकावर टिचुन मिरवणार.
नद्या नाले हसणार.
फुलं पानं बहरणार.
प्राणी पक्षी नाचणार
पैसा संपत्ती जागेवर राहणार.
मी मात्र मिरवणार
आणि तुमची चांगलीच जिवणार.

.....

कु. अदीती पु. राणे B.Sc. (III) CPS

मनाच्या खोल डोहात जरी वादळे अनंत,
तरी उभा हा निष्चल सर्व भार पेलवित....

मग हरायचे नाही बांध निश्चयाची गाठ
घे नकाशे हाती शोध तुझी तुच वाट .....

जेव्हा दिसेल शिखर सुख होईल अनावर
घेता कवेत आकाश होईल जग जिंकल्याचा भास

ह्या एकट्या प्रवासात, तुच तुझी सोबती
तूच तुझी सोबती....

समाधान...

संकलन - मयुर पाचपोळ

0 कि.मी.
घरात टि.व्ही. चं खोकं नव्हत....
मोबाईल मध्ये डोकं नव्हतं....
काचा कवड्याचा खेळ होता...
नणंद भावजईचा मेळ होता...
गुटक्यानं भिती रंगत नव्हत्या....
ब्युटी पार्लरमध्ये झिंगत नव्हत्या....
ओठांवर ओरीजनल लाली होती...
चंद्राची खळी गाली होती...
पोरी मोबाईलवर गात नव्हत्या...
शाळेतून पळून जात नव्हत्या....
वाकडा भांग पाडत नव्हत्या....
तोंड बांधून हिंडत नव्हत्या....
वाघासारखा लेक होता....
तवा बाप माणसात होता....
राजकारणात निष्ठा होती....
खरं बोलणाऱ्यांची चेष्टा होती....
पैशावर पुढारी फुटत नव्हतं....
प्रेम माया अटत नव्हतं....
चांगली माणसं तुटत नव्हती...
चहा-चिवड्याला रडत नव्हती....
चोरुन चिवड्याला रडत नव्हती....
चोरुन पिल्याबिगर चढत नव्हती...
आडाणी नेता भानात होता....
तळातला कार्यकर्ता मनात होता...
सोसायटीचा चेअरमन रानात होता...
तवा माणुस माणसात होता...
गावा शेजारी बार नव्हता...
रस्त्यावर दारुड्याचा कार नव्हता...
पाठीवर दफ्तराचा भार नव्हता...
अनवाणी पायाला रस्ता कुठं गार नव्हता....
हातावर छडीचा मार होता...
शाळेचा मास्तर दिलदार होता...
तवा पैशाला किंमत नव्हती....
आयुष्य म्हणजे गंमत नव्हती.....
घासाघासात कस होता....
माणसाच्या वागण्यात रस होता....
तवा माणुस माणसात होता...

*****

शिकावं की न शिकावं?

मयुर पाचपोळ B.Sc.II (CBZ)

हा एकच प्रश्न माझ्या मनात
घुटमळत होता
गरीबीच्या वादळात मी सतत गुरफटत होता.
संधी तर चांगल्या शिक्षणाची भेटली
पण पैसाही त्याच्या पाठोपाठ फिरत होता
मी स्वप्न तर खूप मोठी मोठी पाहिली
पण मला चिंता होती की सोडावं शिक्षण
आणि कमवावा भरभक्कम पैसा
करावं दूर हे गरीबीचं वादळ
पण आतापर्यंत शिकलो त्याचा काय फायदा?
कशाला दाखविली मोठी स्वप्न आईबाबाला?
म्हणून काहीही असो मला
गरीबीच्या परिस्थितीशी झटायचयं
जिद्दीनं शिकायचयं
पैसा काय आज नाही उद्या आहे
पण शिक्षण आज आहे, उद्या नाही
आणि कधीच नाही.

आई...

प्रा. दिपक झोपे (Physics)

जगण्याच्या धडपडीत,
घर सुटतं पण .....
आठवणी कधी सुटत नाहीत....
तळहाताचा पाळणा करुन सांभाळते ती आपल्याला
आपल्या आयुष्यात आनंदाचा
नेहमीच खुलवते ती मळा
आपण जरी विसरलो,
तरी माया तिची कधी घटत नाही
आयुष्यातलं आई नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही....
तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत
तिला आपलाच लळा असतो
आपलं भलं व्हावं,
ह्यातच तिचा जगण्याचा सोहळा असतो
तिच्या पंखाखाली मन निवांत असते
चिंता कधी वाटत नाही.
आयुष्यातलं आई नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही....
कधीच मिटत नाही.

****

तुच तुझी सोबती...

प्रा. दिपक झोपे (Physics)

कुठल्याशा वळणावरी असेल गाव ओळखीचे
नको घाबरु वळणांना आहे ते तुझ्या सोबतीचे...
उघडूनी डोळे बघ मिळतील साथीदार
दाखवतील ते वाट तू चाल बिनधास्त...
दूर दूर वाट जाते डोंगराच्या मिठीतूनी
पलीकडे उभा असेल तुझा यशाचा पक्षी....
कोरडा उभा हा उंच भेगा त्याच्या अंतरी
उमटती त्याच रेषा तुझ्या तळहातावरी...
खडकाची ही वाट लागेल तुला ठेच
चालावे लागेल तुला तुझे ध्येय हेच...
कधी मध्यानीचा सूर्य जीव होईल व्याकुळ
पारी झिरपता गाली बघ येईल बहर....
डोकावतो संधिप्रकाश ह्या उंच पहाडातूनी
ह्या एकट्या प्रवासात तूच तुझी सोबती....
हो जराशी बेफिकीर घे थोडी मजा लुटून
थोडासा वेडा चाळा हीच जिंदगीची धून....
चढायचे आहेच मोठे मोठे डोंगर
छोटे छोटे पाऊल टाक अगदी होऊन निडर...
दूर ठेव दृष्टी डोंगर रांगातून पार
चालायचे आहे मैलं थकून नाही चालणार....

****

जीवन...

निखिल वि. पाटील M.Sc.II (Chem.)

न कळणाऱ्या जीवनात, थोड सांभाळुन चालावं
सरळ रस्त्यावर वेगाने तर वळणावर पाऊल जपुन टाकावं
जीवनात सदैव आनंदी रहायचं असतं
कारण दु:खाच गाठोड इथं प्रत्येकाच्या नशिबात असतं.
कुणी आपल्यावर कोणाचा भरवसा नाही म्हणून रडतो
तर कुणी,आपण इतरांवर भरवसा ठेवला म्हणून रडतो
जीवनाच्या प्रवासात अनेक लोकं भेटतात,
साथ देणारे कमी अन सोडून जाणारेच जास्त असतात
आयुष्य फक्त जिंकण्यासाठी नसतं,
कधी हरण्यासाठी तर कधी शिकण्यासाठी असतं
वेळ जीवनात सर्व काही शिकवत असते,
आणि जे वेळ शिकवते, ते दुसरं कुणीच शिकवत नसते.
दररोज आपल्याला पाहणारे बरेच लोक असतात
पण लक्षात जास्त तेच राहतात, जे पाहुन न पाहिल्या सारखे करतात
नाही सहन झाल दु:ख तर थोड रडून घ्यावं,
दु:ख सावरतांना मग, सुखासाठी पण तयार असावं.

*****

जगत मी आलो असा की

गझलकार - सुरेश भट

नेहा राऊत B.Sc.I (Bio)

जगत मी आलो असा की, मी जसा जगलोच नाही,
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही ।
जन्मभर अश्रुस माझ्या शिकविलेस नाना बहाणे
सोंग पण फसव्या जीण्याचे, शेवटी शिकलोच नाही।
कैकदा कैफात माझ्या मी विजांचे घोट प्यालो,
पण प्रकाशाला तरीही हाय, मी पटलोच नाही।
सारखे माझ्या स्मितांचे हुंदके सांभाळीले मी,
एकदा हसलो जरासा, मग पुन्हा हसलोच नाही ।
स्मरतही नाहीत मजला चेहरे माझ्या व्यथांचे,
एवढे स्मरते मला की, मी मला स्मरलोच नाही।
वाटले मज गुणगुणावे ओठही पण जाहले तिरहाईत,
सुचत गेली रोज गीते, मी मला सुचलोच नाही।
संपल्यावर खेळ माझ्या आंधळ्या कोशिंबीरीचा,
लोक मज दिसले अचानक, मी कुठे दिसलोच नाही।
जगत मी आलो असा की, मी जसा जगलोच नाही,
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही।

राहून गेलं...

स्नेहल फरपट

माझं काय होईल ?
विचारान वाहून नेलं
हा विचार करतांना
जगायचं राहून गेलं
सुखाच्या क्षणात हसू
पण सुख मात्र आलचं नव्हतं
वाट पाहता पाहता
हसायचं राहून गेलं होतं.
काहीतरी लिहायचं म्हटलं
भावनांच्या प्रवाहाने वाहून नेलं
विचार करता करता
लिहायचं राहून गेलं.

आळस सोडा...

कु. प्रणाली हिवाळे B.Sc. (III)

आली परीक्षा जवळ,
सोडा बाळांनो आळस,
फिरु नका इतरत्र
वेळ जाईल फुकट ॥१॥

बारा महिन्याची खेप
नाही येणार फिरुन
जीवनाच एक साल
मग जाईल निघून ॥२॥

राब-राब राबतात मायबाप
बाळ होईल शहाणा
मेहनत करुन करुन
करील दुरुस्त घराणा ॥३॥

करील प्रगती घराची
आणि लहान भावंडाची
साथ घेऊनी सर्वांची
सेवा करील गावाची ॥४॥

देईल सुख, आईबापा
नीट चालविल समाजनौका
ऋण फेडील समाजाचे
कार्य राष्ट्र घडविण्याचे ॥५॥

राष्ट्रप्रेम...

संकलन - कु. शिवानी शिंदे B.Sc.I (PCM)

राष्ट्रध्वज	–	तिरंगा
राष्ट्रवंदन	–	जयहिंद
राष्ट्रगीत	–	जन-गन-मन
राष्ट्रलिपी	–	देवनागरी
राष्ट्रपक्षी	–	मोर
राष्ट्रभाषा	–	हिंदी
राष्ट्रपिता	–	महात्मा गांधी
राष्ट्रसंत	–	तुकडोजी महाराज
राष्ट्रधर्म	–	अहिंसा
राष्ट्रध्येय	–	समाजवाद
राष्ट्रीय वचन	–	सत्यमेव जयते
राष्ट्रीय वृक्ष	–	अशोक
राष्ट्रीय फुल	–	कमळ
राष्ट्रीय फळ	–	आंबा
राष्ट्रमाता	–	जिजाऊ माता

काही चारोळ्या..

संकलन - कु. शिवानी शिंदे B.Sc.I (PCM)

* सुखाच्या क्षणी सारेच जमा होतात पण ते सरताच दुर दुर जातात.
* जीवनाचं मोल अनमोल आहे नाही कळलं तर मातीमोल आहे.
* ईश्वराचं देणं वेगळच असतं कष्ट करणाऱ्याला ते वेळीच मिळतं.
* थेंबाने थेंब साचतच जातं इवल्याशा थेंबाच तळ्यात रुपांतर होतं.
* सुखच सुख असतांना सुख घेता येत नाही पण दु:खाशिवाय सुखाला किंमतच राहत नाही.
* भाड्याने लाभलेल्या जीवनात सुख सर्वांना हव असतं पण त्या बरोबरच दु:ख सुध्दा पचवावं लागत.
* आनंदाचे जीवन जगता जगता मरण पत्करावे लागते नाही म्हटलं तरी ईश्वराच्या चरणी जावेच लागते.

हिंदी विभाग

मिठी आहट...

कु. महिमा रा. शर्मा
M.Sc. (II) (Chem.)

जिसके साथ खून का सम्बन्ध नही होता,
फिर भी प्रिय लगे...वह है मित्र
जिसके साथ दुनिया भर की बाते करके भी
थकान ना लगे... वह है मित्र
जिसके साथ छोटी सी बात पर भी
खुलकर हंस लेते है.... वह है मित्र
जिसके कंधो पर माथा रखकर
रो सकते है .... वह है मित्र
जिसके साथ ठंडी चाय भी
एकदम गरम लगे .... वह है मित्र
जिसके साथ खिचडी भी खाने में
दावत जैसी लगे .... वह है मित्र
जिसको आधी रात को भी उठाकर
दिल की बात कर सके ..... वह है मित्र
जिसके साथ बिताए गए पलों को याद करने भर
से,
चेहरे पर मुस्कान आ जाए.... वह है मित्र
जिसके साथ कोई भूमिका बनाए बिना खुल कर
बात करें और वह स्विकार करे...वह है मित्र
एक अरसे के बाद भी जिसको मिलते ही
दिल झुम उठे .... वह है मित्र
दूर रहते हुए भी जिसके साथ
दिल के तार जुडे हो .... वह है मित्र
दोस्ती वो है मेरे दोस्त जो बेजान जिंदगी में भी
जान डाल दे ... वह है मित्र

ख्वाहिश नही मुझे मशहूर होने की...

Zarafshan Fatema Naeem Ahmad Siddiqui
B.Sc. (II) (Bio)

ख्वाहिश नही मुझे मशहूर होने की,
आप मुझे पहचानते हो बस इतना ही काफी है।
अच्छे ने अच्छा और बुरे ने बुरा जाना मुझे,
जिसकी जितनी जरुरत थी उसने उतना ही पहचाना मुझे।
जिन्दगी का फलसफा भी कितना अजीब है,
शामें कटती नहीं और साल गुजरते चले जा रहे हैं।
एक अजीब सी दौड है ये जिन्दगी,
जीत जाओ तो कई अपने पीछे छोड जाते है और....
हार जाओ तो अपने ही पीछे जोड जाते है।
बैठ जाता हूँ मिट्टी पे अक्सर,
मुझे अपनी औकात अच्छी लगती है।
मैंने समंदर से सीखा है जीने का तरीका,
चुपचाप से बहना और अपनी मौज में रहना।
ऐसा नहीं की मुझमें कोई ऐब नही है।
पर सच कहता हूँ मुझमें कोई फरेब नहीं है।
जल जाते है मेरे अंदाज से मेरे दुश्मन,
एक मुद्दत से मैंने, न तो मोहब्बत बदली
और न ही दोस्त बदले है।
एक घडी खरीदकर हाथ में क्या बांध ली,
वक्त पीछे ही पड गया मेरे।
सोचा था घर बनाकर बैठूंगा सुकून से,
पर घर की जरुरतो ने मुसाफीर बना डाला मुझे।
सुकून की बात मत कर – बचपनवाला इतवार अब नहीं आता।
जीवन की भागदौड में क्यूँ वक्त के साथ रंगत खो जाती है?
हँसती खेलती जिन्दगी भी आम हो जाती है।
एक सबेरा था जब हँसकर उठते थे हम,
और आज कई बार बिना मुस्कुराए ही शाम हो जाती है।
कितने दूर निकल गए रिश्तो को निभाते निभाते
खुद को खो दिया हमने अपनों को पाते-पाते।
लोग कहते है हम मुस्कुराते बहुत,
और हम थक गए दर्द छुपाते छुपाते।
खुश हूँ और सबको खुश रखता हूँ,
लापरवाह हूँ खुद के लिए मगर सबकी परवाह करता हूँ।
मालूम है कोई मोल नहीं है मेरा फिर भी
कुछ अनमोल लोगो से रिश्ते रखता हूँ।

****

मुल्क और शुल्क....

Zarafshan Fatema Naeem Ahmad Siddiqui
B.Sc. (II) (Bio)

यह नदीयों का मुल्क है,
पानी भी भरपूर है।
बोतल में बिकता है,
पन्द्रह रु शुल्क है।
यह गरीबो का मुल्क है,
जनसंख्या भी भरपूर है।
परिवार नियोजन मानते नही,
जबकी नसबन्दी नि:शुल्क है।
यह अजीब मुल्क है,
निर्बलो पर हर शुल्क है।
अगर आप हो बाहुबली,
हर सुविधा नि:शुल्क है।
यह अपना ही मुल्क है,
कर कुछ सकते नही।
कह कुछ सकते नहीं,
जबकी बोलना नि:शुल्क है।
यह शादियों का मुल्क है,
दान दहेज भी खूब है।
शादी करने को पैसा नही,
जबकी कोर्ट मैरीज नि:शुल्क है।
यह पर्यटन का मुल्क है,
बस/रेलें भी खूब है।
बिना टिकट पकडे गए तो,
रोटी कपडा नि:शुल्क है।
यह अजीब मुल्क है,
हर जरुरत पर शुल्क है।
ढूंढ कर देते है लोग,
पर सलाह नि:शुल्क है।
यह आवाम का मुल्क है,
रहकर चुनने का हक है।
वोट देने जाते नहीं,
जबकी मतदान नि:शुल्क है।

बेचारा आदमी

जब सर के बाल न आये तो दवाई ढूंढता है..
जब आ जाते है तो नाई ढूंढता है...
और जब काले रहते है तो लुगाई ढूंढता है...
जब सफेद हो जाते है तो फिर डाई ढूंढता है...
मुस्कुराईये क्योकि मुस्कुराहट नि:शुल्क है...

The place of Indian Women in India Society

Poonam Anil Fengade
B.Sc. III (CPS) A

"God can not be everywhere, so he created Mother" said Mahatma Gandhi. It means that a women is not nothing but mother for human being. She is the only mother who Sacrifices everything for the welfare of her children.

In ancient time, women in India were given a lot of importance but the time passed on man began looking down on women & exploting them. They created a male dominated society. In which women's task was merely to bear children and look after to the house "kitchen & children" was her heaven. Further to this custom like sati, Child marriage and the ban on the widow remarriage were impossed. These all evils, Weakened her status. She was nullifiled to have any right to participate religious rituals because of the women was not educated. That was the dark period in Indian history but from the last 150 years so many of our social worker (reformer) spent there lives to change womens condition. By launching several movement.

They made the Assessment assure with the women real condition and pressed the government to get them equally or today them are so many signs many charge and importance. The Indian women have stopped out of the house & have started taking up different carrier. Pandit Nehru said that "Women power is the half of every nation and ignoring them no country can process". It is real so in order to improve the condition of women the first thing needs to be done is to create massive social awareness.

****

"LET US STOP CHILD LABOUR"

Dr. R. T. Pahihar

All the school going children wake up carly in the morning to get ready for schools and colleges.""There are many children in our country who have to wake up early in the morning to go out work Instead of going to school. Many children have to work in stone quarries, coal mines, in hotels, construction works. These works are not for them. Their age is to play, study & not to work in such places. But because of their poverty they have to work at such places.""They have to face many problems while working. They have to suffer insulting treatment given by their bosses. But Inspite of that they can't stop doing work, because they want money to fullfill their basic needs. But doing tedious job at a small age. cause a great effect on their health and mental state. People behave with them very unhumanly. Afterall they are not machines they are also humanbeings.""Carrying large stones in stone quarries and also carrying heavy materials in construction site is not an easy task for a child. They have to carry heavy loads on their small heads which is beyond their capacity. Because of this sometimes they also get injured. But we should think about them. We are happy children. We have all necessary things provided to us by our parents like clothes, books, toys and many other things. But what about those children who don't have these things! They don't have sufficient money to buy such things.""We celebrate our birthdays by giving parties to our friends and by buying new clothes. Though we have dozens of dresses in our cupboards. So why should we not give our dresses, toys, books to the poor children. who are needy, Instead of wasting money In buying

unwanted costly clothes & giving parties. By doing this kindly deed. We can also do some social work. It is said by Gandhiji that "Happiness depends upon what you can give not on what you can get." You can see the smiles on the faces of the children. You will also feel satisfied. They will praise you and will be grateful to you. It is rightly said that - One of the sweetest things in life is the sense of satisfaction, which always comes as our reward, when we do a kindly deed. Try it friends and you will find that it drives away all your sadness with a sweet and lasting gladness. The Government has also started some projects for the development of deprived children in India. Many private Institutions are also doing this work. They are working for development of these children. They are providing shelter, food and educational facilities to these children. They also take health care of these children. But I think that these institutions should convince the parents of these children not to send them on such works, and not to send the children in chemical factories. It would help them to stop child labour. Some of the institutions in India also have their greeting cards for sell. By purchasing such cards we can help deprived children Cards are used for the welfare of the deprived children & small children are considered as pillars of the nation. If the pillars are weak the nation will not be strengthened. So we should try to strengthen the pillars now.

Best Thing to Give -

* To your enemy is, Forgiveness.
* To an opponant, to tolerance
* To a friends, your ear.
* To your father, reverence
* To your mother, conduct that will make her proud of you.
* To yourself, respect
* To all men, charity.



Twelve Things -

We have to remember twelve things in life.

1] The value of time.
2] The success of per severance.
3] The pleasure of working.
4] The dignity of simplicity.
5] The worth of character.
6] The power of kindness.
7] The influence of example.
8] The Obligation of duty.
9] The wisdowm of economy.
10] The Virtue of patience.
11] The improvement of talent.
12] The respect of parents and teachers.

झेप वार्षिकांक 2021

Inspirational Poems

Chunauti Chhajed
B.Sc.III (PCM)

Motivational quotes, inspiring words and uplifting rhymes -
this poet is power - packed with poems that everyone right
from teenagers in schools to college students will be able to relate to.
It ain't easy being a student.
You're told what to do everywhere and by everyone you meet -
whether it be your teachers or parents.
The struggle is real and the fight it hard.
as tough as it may seem, perseverance and hard work it the only way forward.
Most importantly, nevery forget that your journey is your own
because no two people are the same.
The most important thing to remember is that it is OK to fail.
It is OK to be down in the dumps.
It is to make mistakes, as long as you are wiling to get back up on your two feet and move on.
Keep learning, keep moving forward - that's the only way to secure an education that'l lay the foundation of your life.

Read on and share these poem with friends who need these words to light the fire in their souls.

******

Teachers....

Ganesh Chopade
B.Sc.III (Bio.)

Paint their minds
and guide their thoughts
Share their achievements
and advise their faults.
Inspire a Love
of knowledge and truth
As you light the path
Which leads our youth.
For our future brightens
with each lesson you teach
Each smile you lengthen
Each goal you help reach.
For the dawn of each poet
each philosopher and king
Begins with a teacher
and the wisdom they bring.

****

What if ?

What if all this time, all this struggle,
has been leading you to a beautiful
chapter in your life ?
What if everything does work out, even
if it doesn't seem like it right now?
What if who I become is who I
needed all along ?
What if all of this hard work leads to
amazing things?
What if you replaced negativity with
optimism?
Would you thoughts and behaviour
change too? I believe so.

Many Teachers ...

Vishal Palve
B.Sc.III (PCM)

Sanskrit words for 'teacher' based on
their unique abilities...
1. The teacher who gives you
information is called : Adhyapak
2. The one who imparts knowledge
combined with information
is called : Upadhyaya.
3. The one who imparts skills is
called : Acharya.
4. The one who is able to give a
deep insight into a subject
is called : Pandit
5. The one who has a visionary view
on a subject and teaches you
to think in that manner
is called : Dhrishta
6. the one who is able to awaken
wisdom in you, leading you from
darkness to light, is called : Guru.
Sanskrit is perhaps, the only
language that has such a refined
vocabulary to distinguish the
different kinds of teachers.

****

Why Me ?

Aditi Purushottam Rane
B.Sc. III (CPS)

If you have to ask Why me ?
When you're feeling really blue,
When the world has turned against you
And you don't know what to do,
When it pours colossal raindrops
And the road's winding Mess,
And you're feeling more confused
Than you ever could express,
When the suddened sun won't shine,
When the stars will not align,
When you'd rather be
Inside your bed,
The covers pulled
Above your head,
When life is something
That you dread
And you have to ask Why Me?
Then when the world seems right and
true,
When rain has left a gently dew,
When you feel happy being you,
Please ask yourself Why Me ?
then, too......

******

।। आमचे प्रेरणास्थान ।।

स्व. दत्तात्रय गोविंद महाजन